सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. ०४ नोव्हेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २०९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | ınbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### सोन्यात प्रति ग्रॅम १७ रुपयांनी वाढ प्रति किलो चांदीत थेट २००० रुपयांची वाढ



मुंबई : दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर सोन्याने आज पुन्हा एकदा वेग धरला आहे. आज सोने जागतिक अस्थिरतेच्या निमित्ताने पुन्हा एकदा महागले असून एकाच दिवसात सोन्याने मोठी रॅली सोमवारी संध्याकाळपर्यंत मिळवली आहे. तर चांदीच्या दरातही सलग दुसऱ्यांदा मोठी वाढ अनिश्चिततेमुळे झाली आहे. सोन्याच्या बाबतीत दोन दिवस स्थिरतेमुळे सोन्याच्या मागणीत झालेल्या घसरणीमुळे दर स्वस्त झाले होते. मात्र पुन्हा एकदा तिसऱ्यांदा युएस बाजारातील फेडरल रिझर्व्ह व्याजदरात कपातीची अनिश्चितता, संभाव्य चीन युएस व्यापारी करार, चीनच्या उत्पादकतेत झालेली घसरण. तसेच चीनकडून सोन्याच्या किरकोळ व्यापाऱ्यांवरून उठलेली सोन्याच्या करावरील १३% सवलत या विविध कारणांमुळे आज सोने पुन्हा एकदा महागले आहे. 'गुडरिटर्न्स' संकेतस्थळावरील माहितीनुसार, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅम दरात १७ रुपयांनी, २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅम दरात १५ रूपयांनी, १८ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅम दरात १३ रुपयांनी वाढ झाली आहे. त्यामुळे प्रति ग्रॅम सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी १२३१७ रूपयांवर, २२ कॅरेटसाठी ११२९० रूपयांवर, १८ कॅरेटसाठी ९२३८ रूपयांवर पोहोचले आहेत.

### आम्ही एक जबाबदार अणु संपन्न देश आहोत - चीन परराष्ट्र मंत्रालय



बीजिंग , ३ नोव्हेंबर : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकताच काही देश अण्वस्त्र चाचणी करत असल्याचा दावा केला. यात त्यांनी चीन आणि रशिया हे देश जमिनीखाली गुप्त पद्धतीने अण्वस्त्र चाचणी घेत असल्याचे ट्रम्प म्हणाले.यावर आता थेट चीनची प्रतिकिया समोर आली आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने डोनाल्ड ट्रम्प यांचा हा दावा खोडून काढला आहे. इतकंच नाही तर, हा दावा फेटाळून लावताना आम्ही एक जबाबदार अणु संपन्न देश आहोत, असे चीनने म्हटले आहे. मीडिया रिपोर्टनुसार, चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने ट्रम्प यांच्या दाव्यांना उत्तर देताना स्पष्ट केले की, चीन एक जबाबदार अण्वस्त्रसज्ज राष्ट्र आहे. बीजिंगने नेहमीच स्व-संरक्षणात्मक अण्वस्त्र धोरण कायम ठेवले आहे आणि अण्वस्त्र चाचणी थांबवण्याच्या आपल्या वचनबद्धतेचे कठोरपणे पालन केले आहे.

### असीम सरोदेंची वकिलीची सनद तीन महिन्यांसाठी रद्द




मुंबई, ३ नोव्हेंबर - प्रसिद्ध विधिज्ञ असीम सरोदे यांची वकिलीची सनद तीन महिन्यांसाठी रद्द करण्यात आली आहे. महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलने सोमवारी हा महत्वपूर्ण निर्णय घेतला. विधिज्ञ विवेकानंद घाटगे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने हे निर्देश दिलेले आहेत. असीम सरोदे यांनी एका सार्वजनिक कार्यक्रमात न्यायव्यवस्था, राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्ष यांच्यासंदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. त्यामुळे त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत सुरु असलेल्या सुनावणीत सहभागी असणाऱ्या वकिलांपैकी असीम सरोदे हे सर्वोच्च न्यायालयात एक आहेत. मात्र, आता त्यांची सनद रद्द झाल्याने त्यांना न्यायालयात युक्तिवाद करता येणार नाही. सरोदे यांनी एका सार्वजनिक कार्यक्रमात न्यायव्यवस्था, राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्ष यांच्या संदर्भात काही वादग्रस्त वक्तव्ये केली होती.

### बीसीसीआयकडून भारतीय महिला क्रिकेट संघाला ५१ कोटींचे बक्षिस

मुंबई, ३ नोव्हेंबर : बीसीसीआयने २०२५ च्या आयसीसी महिला विश्वचषक जिंकल्याबद्दल टीम इंडियाला ५१ कोटी रोख बक्षीस देण्याची घोषणा केली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव देवजित सैकिया म्हणाले, ज्याप्रमाणे कपिल देव यांच्या संघाने १९८३ मध्ये भारतीय क्रिकेटमध्ये एका नवीन युगाची सुरुवात केली, त्याचप्रमाणे कर्णधार हरमनप्रीत कौर यांच्या संघाने आज देशभरातील लोकांची मने जिंकली आहेत. त्यांनी पुढे सांगितले की, बीसीसीआय सचिव जय शाह यांच्या नेतृत्वाखाली महिला क्रिकेटमध्ये अनेक बदल करण्यात आले आहेत. वेतन समता लागू करण्यात आली आहे. जय शाह यांनी महिला विश्वचषक बक्षीस रकमेत ३०० टक्क्यांनी वाढ करून १४ दशलक्ष डॉलर्स केले. म्हणून, यावर्षीच्या आयसीसी महिला विश्वचषक जिंकल्याबद्दल ५१ कोटी रोख बक्षीस देण्यात येईल.

# बिहारमध्ये प्रचंड बहुमताने एनडीए सरकार स्थापन होईल : अमित शाह



पाटणा : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी शेओहर आणि सीतामढी जिल्ह्यात राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) उमेदवारांच्या समर्थनार्थ निवडणूक सभांना संबोधित केले जनतेला त्यांना मतदान करण्याचे आवाहन केले. या सभांमध्ये त्यांनी राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांवर प्रकाश टाकला आणि विरोधी महाआघाडीवर जोरदार निशाणा साधला.

या सभेला संबोधित करताना अमित शाह म्हणाले, मी आत्ताच येथून बिहार निवडणुकीचे निकाल जाहीर करेन. १४ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजेपर्यंत लालू-राहुल यांच्या पक्षाचा पराभव होईल. बिहारमध्ये प्रचंड बहुमताने एनडीए सरकार स्थापन होत आहे.

अमित शहा म्हणाले, लालू यादव यांना त्यांचा मुलगा मुख्यमंत्री हवा आहे आणि सोनिया गांधींना त्यांचा मुलगा पंतप्रधान हवा आहे. पण आज मी बिहारच्या मातीतून सांगतो की लालूंचा मुलगा बिहारचा मुख्यमंत्री होणार नाही आणि सोनियांचा मुलगा देशाचा पंतप्रधान होणार नाही. कारण बिहारमध्ये नितीश कुमार आहेत आणि देशाकडे मोदी आहेत.

अमित शहा म्हणाले की नितीश-मोदी जोडीने बिहारला जंगलराजपासून आणि देशाला घराणेशाहीच्या राजकारणापासून मुक्त केले आहे. एनडीएचे राजकारण सेवा आणि विकासाबद्दल आहे, तर विरोधी पक्षांचे राजकारण स्वार्थ आणि कुटुंबाबद्दल आहे.

महाआघाडीवर टीका करताना अमित शहा म्हणाले की, 'ग्रँड ठग अलायन्स'ला ना नेता आहे ना धोरण. या लोकांना स्वतःला माहित नाही की कोण कोणत्या जागेवरून निवडणूक लढवत आहे. जनतेने आता अशा विसंगत युती ओळखल्या आहेत, जे फक्त सत्तेसाठी एकत्र येतात आणि नंतर निवडणुका संपताच एकमेकांना दोष देऊ लागतात.

अमित शाह यांनी घोषणा केली की ज्या दिवशी सीतामढीमध्ये सीतेच्या मंदिराचे अभिषेक होईल, त्याच दिवशी सीतामढीहून अयोध्यासाठी वंदे भारत ट्रेन देखील सोडली जाईल. अयोध्येत येणारे लोक सीतामढीलाही भेट देतील आणि यामुळे बिहारच्या पर्यटनाला मोठा फायदा होईल.

राहुल गांधींनी केला छठी मैय्याचा अपमान

गृहमंत्री शाह म्हणाले की राहुल गांधींनी छठी मैय्याचा अपमान केला आहे. राहुल गांधी, मोदींचा अपमान करून तुम्ही छठी मैय्याचा अपमान केला आहे. जेव्हा जेव्हा तुम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदींचा अपमान केला आहे, तेव्हा जनतेने तुम्हाला पराभूत करून प्रतिसाद दिला आहे. यावेळी, तुम्ही मोदींसह छठी मैय्याचा अपमान केला आहे. सीतामढीच्या लोकांनी येत्या निवडणुकीत हे लक्षात ठेवावे.

अमित शाह यांनी दावा केला की संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या १० वर्षांच्या कार्यकाळात बिहारला फक्त २.८० लाख कोटी रुपये देण्यात आले, तर एनडीए सरकारच्या ११ वर्षांच्या कार्यकाळात ही रक्कम १८.७० लाख कोटी रुपये झाली आहे. केंद्रातील काँग्रेस सरकारच्या १० वर्षांच्या काळात बिहारला फक्त २,८०,००० कोटी रुपये देण्यात आले होते, तर मोदी सरकारच्या १० वर्षांच्या काळात बिहारला १,८७,००० कोटी रुपये देण्यात आले आहेत.

# २० हून अधिक लोकांचा दुर्दैवी अंत!

## हायस्पीड लॉरी थेट बसमध्ये घुसली; किंचाळ्या आणि रक्ताचा सडा

तेलंगणा : तेलंगणा राज्याच्या रंगारेड्डी जिल्ह्यातील चेवेल्ला मंडल येथे झालेल्या एका भीषण बस अपघातामुळे संपूर्ण परिसर हादरला आहे. या दुर्घटनेत मृतांची संख्या वाढून २० वर पोहोचली आहे. हा भीषण अपघात हैदराबाद-विजापूर महामार्गावर चेवेल्ला मंडळातील मिर्झागुडा जवळ घडला. तंदूर डेपोची आरटीसी बस आणि गिट्टीने भरलेला टिप्पर ट्रक यांच्यात समोरासमोर जोरदार धडक झाली. धडक इतकी भीषण होती की, टिप्पर ट्रकमध्ये भरलेली खडी बसच्या आत कोसळली. यामुळे बसमधील अनेक प्रवासी चिरडले गेले. या भीषण दुर्घटनेत टिप्पर चालकाचाही जागीच मृत्यू झाला, तर डझनभर प्रवासी जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अपघाताच्या वेळी बसमध्ये ७० हून अधिक प्रवासी होते. यातील २० जणांना आपले प्राण गमवावे लागले असून, जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

जखमींवर चेवेल्ला रुग्णालयात उपचार सुरू

तेलंगणामधील चेवेल्ला मंडल येथे टिप्पर आणि आरटीसी बसच्या जबर धडकेनंतर अपघातग्रस्त बसमध्ये मोठा गोंधळ उडाला. अपघातानंतर बसमध्ये आरडा-ओरडा, किंकाळ्यांनी वातावरण भरून गेले आणि



अफरातफरी माजली. अनेक प्रवाशांना गंभीर दुखापत झाली. अनेक प्रवासी चिरडले गेले होते, तर जखमींच्या किंचाळ्या, रक्ताने भरलेली सीट असे हृदयद्रावक दृश्य घटनास्थळी दिसत होते. अपघाताचे वृत्त कळताच स्थानिकांनी आणि पोलिसांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेत बचाव कार्य सुरू केले. बसमधील जखमींना बाहेर काढून उपचारांसाठी चेवेल्ला येथील सरकारी रुग्णालयात हलवण्यात आले, जिथे त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांनी याप्रकरणी तपास सुरू केला आहे. मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी या घटनेवर तीव्र दुःख व्यक्त केले असून, अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक सूचना दिल्या आहेत. कोणत्याही परिस्थितीत घटनास्थळी मदत आणि बचाव कार्य जलद गतीने पूर्ण करावे आणि जखमींना सर्वोत्तम उपचार मिळावेत, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे.

जखमींवर हैदराबादमध्ये उपचार करा; मुख्यमंत्र्यांचे तातडीचे निर्देश

अपघातात जखमी झालेल्या प्रत्येक व्यक्तीला तात्काळ हैदराबादमधील रुग्णालयात हलवावे, अशा सूचना त्यांनी तेलंगणाचे मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालक यांना दिल्या आहेत. जखमींच्या उपचारांमध्ये कोणतीही कमतरता नसावी आणि त्यांना सर्वोत्तम वैद्यकीय सुविधा मिळाव्यात, याची काळजी घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना प्रत्येक स्तरावरील परिस्थितीची माहिती देण्याचे आणि अपघाताबाबत सतत अपडेट्स देण्याचीही सूचना दिली आहे. तसेच, घटनास्थळाजवळील मंत्र्यांनी तातडीने तेथे पोहोचून परिस्थितीचा आढावा घेण्याचे आणि प्रशासनाला सर्वतोपरी मदत करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी या संकटाच्या काळात प्रशासन पूर्ण क्षमतेने काम करेल, अशी ग्वाही दिली आहे.

# केवळ लग्नास नकार देणे आत्महत्येस चिथावणी ठरत नाही : सर्वोच्च न्यायालय




## पुरुषाविरुद्ध आत्महत्येला प्रवृत्त केल्याचा खटला रद्द

नवी दिल्ली : एका तरुणीने आपले जीवन संपवण्याचे टोकाचे पाऊल उचलले हे खूप दुःखद आहे. तिला कदाचित वाईट वाटले असेल. एकासंवेदनशील क्षणी तिने जीवन संपविण्याचा निर्णय घेतला. तथापि, न्यायाधीश म्हणून, आम्ही रेकॉर्डवरील पुराव्यांच्या आधारे प्रकरणाचा निर्णय घेण्यास बांधील आहोत, असे निरीक्षण नोंदवत केवळ लग्न करण्यास नकार देणे आयपीसीच्या कलम १०७ अंतर्गत स्पष्ट केल्याप्रमाणे जीवन संपविण्यास प्रवृत्त करणे नव्हे, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच एका व्यक्तीने विवाहास नकार दिल्याने एका महिलेने जीवन संपविल्याप्रकरणी पुरुषाविरुद्ध आत्महत्येला प्रवृत्त करण्याचा खटलाही न्यायालयाने रद्द केला.

महिलेने आत्महत्याप्रकरणी २०१६ मध्ये अमृतसरच्या छेहरता पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. महिलेच्या आईने आरोप केला होता की, सरकारी वकील असणाऱ्या या मुलीने विषप्राशन करून जीवन संपवले. याचिकाकर्त्याने तिच्याशी लग्न करण्याचे वचन दिले होते; परंतु नंतर त्याने लग्नास नकार देत विश्वासघात केला. यामुळेच महिलेने जीवन संपवले. या प्रकरणी आयपीसीच्या कलम ३०६ अंतर्गत त्याच्याविरुद्ध दाखल केलेला गुन्हा रद्द करण्यास पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने नकार दिल्याच्या निर्णयाला संशयित आरोपीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. निपुण अनेजा विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य या प्रकरणातील मागील निकालांचा हवाला देण्यात आला.

# योगी आदित्यनाथ यांचा बिहारमधून राहुल, तेजस्वी, अखिलेशवर हल्लाबोल



दरभंगा : बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या रणधुमाळीत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी महाआघाडीच्या नेत्यांवर थेट हल्ला चढवला आहे. दरभंगा येथील जाहीर सभेत बोलताना योगींनी काँग्रेस नेते राहुल गांधी (पप्पू), राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव (टप्पू) आणि समाजवादी पक्षाचे (डझ) अध्यक्ष अखिलेश यादव (अप्पू) या तिघांची तुलना थेट महात्मा गांधींच्या तीन माकडांशी केली.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले, तुम्ही महात्मा गांधी यांच्या तीन माकडांबद्दल ऐकले असेलच, जी 'वाईट बोलू नका, वाईट ऐकू नका आणि वाईट पाहू नका' हा संदेश देतात. तशीच तीन माकडे आता महाआघाडीत सामील झाली आहेत.

योगींनी या तिन्ही नेत्यांची खिल्ली उडवत त्यांचे वर्णन केले...

पप्पू (राहुल गांधी): चांगले बोलू शकत नाही.

टप्पू (तेजस्वी यादव): चांगले पाहू शकत नाही.

अप्पू (अखिलेश यादव): सत्य ऐकू शकत नाही.

या तिघांकडून बिहारमध्ये झालेल्या विकासकामांकडे सर्रास दुर्लक्ष करून अपप्रचार केला जात असल्याचा आरोप योगींनी केला.

विकासकामांवर दुर्लक्ष आणि माफियांच्या बाजूने उभे राहण्याचा आरोप

योगी आदित्यनाथ यांनी महाआघाडीवर माफियांसोबत हातमिळवणी करणे आणि राज्यात जातीय तेढ निर्माण केल्याचा गंभीर आरोप केला. त्यांनी म्हटले की, भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने बिहारमध्ये अनेक विकासकामे केली असतानाही विरोधी महाआघाडीचे नेते माफियांना मिठी मारून राज्याची सुरक्षा बिघडवण्याचा प्रयत्न करीत आहेत.

# निषेध मोर्चा काढल्याबद्दल नांदगावकर यांच्यासह पाच जणांविरुद्ध गुन्हा

मुंबई : दक्षिण मुंबईत शनिवारी 'सत्याचा मोर्चा'आयोजित करणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) राज्य उपाध्यक्ष बाळा नांदगावकर यांच्यासह सहा जणांविरुद्ध आझाद मैदान पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्यावर बेकायदेशीर सभा आयोजित केल्याबद्दल आणि प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, महापालिका मार्गावर १०,००० हून अधिक लोक जमले होते आणि या निषेधाचे नेतृत्व राष्ट्रवादी (सपा) सुप्रीमो शरद पवार यांच्यासह अनेक काँग्रेस नेते, शिवसेना (यूबीटी) प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष



राज ठाकरे यांच्यासह प्रमुख नेत्यांनी केले होते. बेकायदेशीर मेळावा आणि सरकारी आदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल बीएनएसच्या २२३ च्या संबंधित कलमांसह बीएनएस कायद्याच्या ३७ (३) आणि १३५ अंतर्गत हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महापालिका मार्गावरील निदर्शने महाविकास आघाडी, युती आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी आयोजित केली होती. नांदगावकर यांच्याव्यतिरिक्त कुलाबा विभाग प्रमुख बबन महाडिक; उबाठा गटाचे जयवंत नाईक; बबन घरत; आणि मनसेचे अरविंद गावडे यांच्यावरही गुन्हा दाखल केला.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आयोजकांनी निदर्शने करण्याची परवानगी घेतली नव्हती. दक्षिण मुंबईत प्रतिबंधात्मक आदेशानुसार निदर्शने आणि रॅलींना परवानगी नाही असे राजकीय पक्षातील लोकांना सांगण्यात आले होते आणि तरीही त्यांनी निदर्शने केली, असे आझाद मैदान पोलिस ठाण्याच्या एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. मतदार यादीतील कथित अनियमितता, मतदारांच्या माहितीचा गैरवापर आणि निवडणूक आयोगाच्या निष्काळजीपणाच्या विरोधात निषेध करण्यासाठी 'सत्याचा मोर्चा' आयोजित करण्यात आला होता. दरम्यान, गिरगाव परिसरात सत्ताधारी पक्ष भाजप समर्थकांनी आणखी एक निदर्शने केली असता, डीबी मार्ग पोलिसांनी बेकायदेशीर सभा घेतल्याच्या आरोपाखाली १०० हून अधिक अज्ञात लोकांवर गुन्हा दाखल केला.

# ट्रेलरला धडकलेल्या बसमध्ये १८ भाविकांचा दुर्दैवी अंत

जयपूर : राजस्थानमधील जोधपूर जिल्ह्यामध्ये एक अत्यंत दुर्दैवी रस्ता अपघात घडला आहे. हा अपघात फलोदी तालुक्यात झाला, जिथे एका टेम्पो ट्रॅव्हलरने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रेलरला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, टेम्पो ट्रॅव्हलरचे अक्षरशः तुकडे झाले. या अपघातामुळे टेम्पो ट्रॅव्हलरमध्ये अडकलेल्या अनेक प्रवाशांना गंभीर दुखापत झाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, टेम्पो ट्रॅव्हलरच्या चालकाने रस्त्याच्या कडेला उभा असलेला ट्रेलर पाहिला नाही, आणि याच मानवी चुकीमुळे हा अपघात झाला असल्याचे सांगितले जात आहे. घटनेची माहिती मिळताच तातडीने मदत व बचावकार्य सुरू करण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, या भीषण अपघातात १८ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे, तर अनेक प्रवासी जखमी झाले आहेत. बचावकार्य अजूनही सुरू आहे, त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासकीय अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमींना तत्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या भीषण दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

१८ जणांचा बळी, मृतांमध्ये महिला-लहान मुलांचाही समावेश!

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भाविकांची ही टेम्पो ट्रॅव्हलर बस जोधपूरच्या सूरसागर भागातून बीकानेर जिल्ह्यातील कोलायत तीर्थक्षेत्री दर्शनासाठी गेली होती. दर्शन घेऊन परत येत असताना, मतोडाजवळ रस्त्यावर उभ्या असलेल्या एका ट्रेलरला बसची जोरदार धडक बसली. मतोडा पोलीस ठाण्याचे अधिकारी यांनी सांगितले की, बस भरधाव वेगात असताना रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रेलरला धडकली. चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या भीषण अपघातात आतापर्यंत १८ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ३ ते ४ प्रवासी जखमी झाले आहेत. मृतांमध्ये महिला आणि लहान मुलांचाही समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे. अचानक झालेल्या या अपघाताने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

घटनास्थळी पोलीस, स्थानिक प्रशासन आणि रुग्णवाहिका टीम तातडीने दाखल झाल्या आणि त्यांनी तात्काळ बचावकार्य सुरू केले. गॅस कटरच्या मदतीने बसमध्ये अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यात आले. जखमी भाविकांना प्राथमिक उपचार देऊन जोधपूरमधील एसएमएस आणि एमडीएम रुग्णालयात उपचारासाठी पाठवण्यात आले आहे. मृतांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी फलोदी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत.

स्थानिक नागरिकांची प्रशासनाकडे संतप्त मागणी

अपघाताची गंभीरता लक्षात घेता, प्रशासनाने या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. स्थानिक नागरिकांनी आता प्रशासनाकडे कठोर मागणी केली आहे. रस्त्याच्या कडेला उभे असलेल्या अवजड वाहनांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. रस्त्यावर बेकायदेशीरपणे उभी असलेली वाहने अनेक अपघातांना कारणीभूत ठरत असल्यामुळे ही कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## टोयोटा किर्लोस्कर मोटरने ऑक्टोबर २०२५ मध्ये ४२,८९२ युनिट्सची विक्री केली

बेंगळुरू : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम)ने आज ऑक्टोबर २०२५ या उत्सवी महिन्यासाठी आपल्या विक्री निकालांची घोषणा केली, वरिंदर वाधवा, उपाध्यक्ष, सेल्स-सर्विस-युज्ड कार बिझनेस ''आमच्या विकासामधून आमच्या कार्यसंचालनांमधील विनासायास समन्वय आणि ग्राहक-केंद्रित्वाप्रती अविरत कटिबद्धता दिसून येते. नुकतेच लॉंच करण्यात आलेल्या अर्बन क्रूझर हायराइडर ऐरो एडिशन आणि २०२५ फॉर्च्युनर लीडर एडिशनच्या उत्सवी एडिशन्सचे त्यांची अद्वितीय स्टायलिंग व प्रीमियम मूल्य तत्त्वासाठी मोठ्या प्रमाणात कौतुक करण्यात आले आहे. हे मॉडेल्स अधिकृत डिलरशिप्समध्ये बुकिंग व डिलिव्हरीसाठी उपलब्ध आहेत. ड्रम ताओसोबत आमच्या सहयोगाने ग्राहक उत्साह आणि सहभाग वाढवला आहे. तसेच, सणासुदीच्या काळात अनुकूल आर्थिक वातावरण, सरकारच्या दूरगामी जीएसटी सुधारणा अशा घटकांनी बाजारपेठेत आत्मविश्वास देखील वाढवला आहे. टीकेएममध्ये यामुळे ग्राहक चौकशी व ऑर्डर घेण्याच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे, जे एकत्रित आमच्या एकूण कार्यक्षमतेला चालना देत आहेत.''

## स्पेशल हँडलूम एक्स्पो २०२५ परंपरेचे धागे ठाण्यात सुरू

मुंबई : ठाणे शहर सध्या भारताच्या रंगीबेरंगी विणकाम, परंपरा आणि कलांनी सजलेले आहे. स्पेशल हँडलूम एक्स्पो २०२५ (द्वितीय आवृत्ती) चे उद्घाटन आज सीकेपी हॉल, खरकर लेन, ठाणे (महाराष्ट्र) येथे झाले. ही प्रदर्शनी नॅशनल डिझाईन सेंटर (छऊऊ) तर्फे आयोजित करण्यात आली असून, विकास आयुक्त (हँडलूम), वस्त्र मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने आयोजित केली आहे. ही एक्स्पो ३ ते ९ नोव्हेंबर २०२५ दरम्यान दररोज सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुली राहील. या एक्स्पोमध्ये देशभरातील बुनकर (विणकर) आपली अनोखी कलाकृती आणि पारंपरिक डिझाईन्स प्रदर्शित करत आहेत. तेलंगणा, आंध्र प्रदेश, तमिळनाडू, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, ओडिशा, महाराष्ट्र, गुजरात अशा विविध राज्यांतील प्रसिद्ध हँडलूम उत्पादने येथे पाहायला मिळत आहेत. रेशमी साड्या, दुपट्टे, स्टोल, ड्रेस मटेरियल, शाल तसेच गृहसजावटीच्या वस्तू त्यांच्या रंग, बुनावट आणि दर्जामुळे लोकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

## मानसिक आरोग्यविषयक माइंडफॉरवर्ड इंडिया कॉन्क्लेव्हचे आयोजन

मुंबई : भारतातील नामांकित मानसिक आरोग्य तज्ज्ञ पुण्यात झालेल्या 'माइंडफॉरवर्ड इंडिया कॉन्क्लेव्ह' मध्ये एकत्र आले. शहरात प्रथमच अशा प्रकारचा हा उपक्रम झाला असून या प्रसंगी 'हॅपी स्टडीस्पेसेस' या विशेष विद्यार्थी-केंद्रित मानसिक आरोग्य उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या माध्यमातून पुण्यातील महाविद्यालयांमधील ५०,००० हून अधिक विद्यार्थ्यांना मोफत व्यावसायिक समुपदेशन आणि मानसिक आरोग्य सहाय्य उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. हा उपक्रम अपोलो हॉस्पिटल्स समूहातील 'अपोलो टेलिमेडिसिन नेटवर्किंग फाउंडेशन ' तर्फे राबविला जात असून 'बीपी) या आंतरराष्ट्रीय ऊर्जा कंपनीचे सहकार्य त्यास लाभले आहे. हॅपी स्टडीस्पेसेस' उपक्रमाचा उद्देश प्रत्येक कॅम्पसला काळजी, संवाद आणि आत्मविश्वासाचे केंद्र बनविणे हा आहे. यात एआय-आधारित मानसिक आरोग्य मूल्यांकन प्रणाली, टप्प्याटप्प्याने केलेले समुपदेशन मॉडेल, तसेच रेझिलियन्स टिप्स, कौन्सेलिंग आणि स्पेशालिस्ट रेफरल्ससह सातत्यपूर्ण फॉलोअपचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना कौन्सेलिंग हेल्पलाईन, व्हॉट्सअ‍ॅप सपोर्ट चॅनल, तसेच 'हॅपीयू क्लब' या सहविद्यार्थी-नेतृत्वाखालील मानसिक तंदुरुस्ती उपक्रमांचा लाभ मिळणार आहे.

## सिल्लोड तालुक्यातील ९४ तीव्र कुपोषित बालके ग्रामपंचायत अधिकारी संघटना यांनी घेतले दत्तक

सिल्लोड प्रतिनिधी : मा.जिल्हाधिकारी दिलीप स्वामी साहेब व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर श्री अंकित साहेब यांच्या आदेशान्वये तसेच मा. गटविकास अधिकारी वर्ग १,पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगार यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली सिल्लोड तालुक्यातील एकूण ९४ तीव्र कुपोषित बालकांना ग्रामपंचायत अधिकारी संघटनेने दत्तक घेतले या बालकांच्या घरी दिनांक एक नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी प्रत्यक्ष भेटू देऊन कुपोषित बालकांना दररोज अंडी, केळी, मटकी उसळ, उपमा, गुळ शेंगदाणा लाडू, लापसी, शेवगा शेंगा सूप,सफरचंद,डाळिंब, पपई,बीट पराठा, पालक पराठा, पोळी भाजी, वरण भात व खिचडी असा विविध प्रकारचा सकस आहार बदलून बदलून दररोज प्रत्यक्ष आपल्यासमोर खाऊ घालून त्यांना कुपोषण मुक्त करण्याची जबाबदारी घेतली सोबत ग्रामपंचायत अधिकारी, आरोग्य सेवक,अंगणवाडी ताई हे कर्मचारी स्वतः उपस्थित राहून जो पर्यंत ही ९४ कुपोषित बालके कुपोषण मुक्त होत नाही तोपर्यंत त्यांना नियमित आहार देऊन कुपोषणातून मुक्त करणार आहे. त्यामुळे सदर बालके सुदृढ आणि सक्षम करण्याचा संघटनेचा मानस आहे.



## अंबादास मरकड यांचे निधन

सिल्लोड प्रतिनिधी मंगरूळ तालुका सिल्लोड येथील वारकरी संप्रदायातील सर्वात ज्येष्ठ वारकरी अंबादास बाबुराव मरकड यांचे रविवारी ठीक साडेबारा वाजता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले त्यांच्या पाश्चात दोन मुले एक मुलगी जावई असा मोठा परिवार आहे.



## राजेंद्र पाटणी यांचे निधन

छत्रपती संभाजीगर : उमापूर, ता.गेवराई, जि.बीड येथील प्रसिध्द व्यापारी राजेंद्र भगवानदास पाटणी (५८) यांचे रविवार, दि.२ नोव्हेंबर सकाळी २.१० समाधी मरण गुजरात येथील पावागढ सिध्दक्षेत्र येथे आचार्य मयंक सागरजी महाराज ससंघ यांच्या सानिध्यात समता पूर्वक समाधी मरण झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले, असा परिवार आहे. सत्यम भैय्या, अभिजीत व मोहित यांचे वडील होते.


### हिंगोली नगरपरिषद हिंगोली, नगर पालिका हिंगोली

फोन नं. (०२४५६) २२१७२७, फॅक्स नं. (०२४५६) २२१७२७,
E-Mail-coud.hingoli@maharashtra.gov.in
विभागः- बा.वि. जा.क्र./न.पा./२११२/२०२५-२६ दिनांक :-०३/११/२०२५

ई-निविदा कार्यप्रणाली अंतर्गत निविदा सुचना सन २०२५-२६

### ई-निविदा

मुख्याधिकारी नगर परिषद हिंगोली (दुरध्वनी क्र.०२४५६-२२१७२७ ई-मेल coud.hingoli@maharashtra.gov.i नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत मागासक्षेत्राव्यतिरिक्त नागरी क्षेत्रातील सुधारणा योजना (दलितेत्तर योजना) (जिल्हास्तर) सिमेंट रस्ता बांधकाम करणे या कामाकरिता निविदा कंत्राटदारा कडुन ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे ई-टेंडरींग पध्दतीने दिनांक ११/११/२०२५ वेळ दुपारी / संध्या. ४.०० वाजे पर्यंत एकुण (०१) कामाच्या एकत्रीत पणे निविदा मागवित आहेत. निविदा विषयी तपशिल महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग पोर्टल http://mahatenders.gov.in वर दि. ०४/०३/२०२५ रोजी संपुर्ण माहिती व अटी व शर्तीसह सकाळी / दुपारी १२.०० वाजता पासून पहावयास मिळेल.

सही/-
नगर अभियंता
हिंगीली नगर परिषद, हिंगोली

सही/-
मुख्याधिकारी
हिंगोली नगर परिषद, हिंगोली


# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनसंवाद यात्रेला प्रारंभ



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.३:गंगापूर शहरात आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने जनसंवाद यात्रेला प्रारंभ करण्यात आला.

या यात्रेचा मुख्य उद्देश म्हणजे - शहरातील प्रत्येक प्रभागात जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधणे, त्यांच्या अडचणी जाणून घेणे आणि त्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी पक्षाने ठोस पावले उचलावीत हा आहे.

या जनसंवाद यात्रेचा शुभारंभ तुकाराम सटले, विशाल दारुंटे, गणेश चव्हाण, सुरेश बोर्डे, रविराज लाड, चिन्मय कुलकर्णी, स्वप्निल मस्के, संदीप पानखडे, शुभम राजपूत, अमीर सोहेल आणि जालिंदर पाटील यांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला.

या प्रसंगी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकच आवाजात निर्धार व्यक्त केला की -गंगापूर शहरातील प्रत्येक नागरिकापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विकासाचा संदेश पोहोचवला जाईल, प्रत्येक प्रभागातील समस्या समजून घेतल्या जातील, आणि त्या समस्यांचे समाधान करण्यासाठी पक्ष सदैव अग्रभागी राहील.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नेहमीच जनतेच्या सोबत उभा राहिला आहे आणि या जनसंवाद यात्रेद्वारे पक्ष पुन्हा एकदा जनतेच्या मनाशी संवाद साधत आहे - विकास, पारदर्शकता आणि बदलाची दिशा देत आहे.

# छत्रपती संभाजीनगर : शिवसेनेचा कार्यकर्ता मेळावा उत्साहात



छत्रपती संभाजीनगर, ३ नोव्हेंबर : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मौजे गारज येथे शिवसेना आमदार रमेश बोरणारे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना कार्यकर्ता मेळावा उत्साहात आयोजित करण्यात आला. या मेळाव्यात उपस्थित राहून आगामी नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत तसेच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले आणि संघटन अधिक सक्षम करण्याचे आवाहन केले.

संघटन बळकट ठेवून प्रत्येक गावात शिवसेनेचा झेंडा आणखी उंच फडकवण्याचा निर्धार सर्व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. कार्यकर्त्यांचा उत्साह, निष्ठा आणि एकजूट पाहून आगामी निवडणुकांत निश्चितच शिवसेना प्रबळ शक्ती म्हणून पुढे येईल, असा विश्वास व्यक्त केला.

तसेच माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगावकर यांची शिवसेना लोकसभा प्रमुख पदी आणि बाबासाहेब पाटील जगताप यांची शिवसेना जिल्हाप्रमुख पदी झालेली निवड ही केवळ नियुक्ती नाही, तर शिवसेनेच्या कार्यकर्त्यांच्या आत्मविश्वासाचा विजय असल्याने या नियुक्तीच्या निमित्ताने त्यांचा भव्य सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला उपनगराध्यक्ष साबेरभाई, कृ.उ.बा. सभापती रामहरी बापू जाधव, मा सभापती भागीनाथ दादा मगर, शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र पा साळुंके, यांच्या विशेष उपस्थितीसह सर्व प्रमुख पदाधिकारी पंचक्रोशीतील सरपंच, उपसरपंच, चेअरमन, ग्रामपंचायत सदस्य, व्हाईस चेअरमन व गावकरी उपस्थित होते.

# सोयगाव तालुक्यातील जरंडी येथे रक्तदान शिबिर संपन्न



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३ नोव्हेंबर

सोयगाव तालुक्यातील जरंडी येथे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्ताने व व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जन्मशताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने रक्तदान शिबिर श्री बालाजी मंदिरात आयोजित करण्यात आले होते.यामध्ये ७० रक्तदात्यांनी रक्तदान केले.रक्त संकलनाचे कार्य दत्ताची भाले रक्तपेढी छत्रपती संभाजीनगर च्या पुढील कर्मचाऱ्यांनी केले.रक्तदान आटोपल्यानंतर सर्व कर्मचाऱ्यांनी जरंडी ग्रामपंचायतच्या हुतात्मा स्मारकातील गार्डनला भेट दिली व गावाचे व ग्राम पंचायतचे कार्याचे कौतुक केले.यावेळी दत्ताजी भाले रक्तपेढी छत्रपती संभाजीनगर येथील डॉ.अमर सातपुते,प्रशांत चिटणीस,आजीनाथ भडक,स्वप्निल पवार, योगेश दहीवाल,राधा गवारे,आरती बामणे,विजय पैठणकर ज्ञानेश्वर भालेकर,दुर्गा वाघ,सुभाष कदम,सह दत्ताजी भाले रक्तपेढी कर्मचारी यांचे सह सर्व स्वयंसेवक व जरंडी गावातील ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले सर्वांनी श्री. बालासाहेब संस्थान चे आभार मानले.

# ॲडव्होकेट प्रोटेक्शन क्ट मंजूर करावा, आणि वकिलांवर होणारे हल्ल्याचा निषेध



तसा वृत्तसेवा

गंगापूर दि.३ : वकिलांवर वारंवार होणाऱ्या हल्ल्याचा निषेध आणि एडवोकेट प्रोटेक्शन क्ट लवकरात लवकर मंजूर करून लागू करण्यात यावा या मागणीसाठी महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिल यांच्या निर्देशानुसार गंगापूर जिल्हा व सत्र न्यायालय येथील वकील संघाने लाल पिके लावून कोर्टात कामकाज केले.

यावेळी वकील संघ अध्यक्ष अ‍ॅड किशोर क-हाळे,उपाध्यक्ष अ‍ॅड.अमोल ठाकुर, सचिव अ‍ॅड.विठ्ठल काळे अ‍ॅड.बी. आर.राजपूत, पि.बी.जोशी,व्ही. एस. मनोरकर, एस. के. नरोडे, ए.बी. कुलकर्णी, डि. व्ही.साबणे,जी.बी. चव्हाण, पी.एस.पांडे,रविराज दारुंटे,एस. एन.साबणे,अमोल रासकर,बी. एस. शिंदे ,ए. एस. करडे ,पी.डी. देशपांडे , सुनील सावंत,ए.एस. इंगळे, डि. ई. पानकडे, डि.के. तारू , संजय भोकरे,वाय.एन.जाधव,टि.व्ही. कोल्हे, आर. जी. बोठे, एम.डी. तांबे,एस.बी. शेख ,महेश गुडदे,एम. पी. दारुंटे, पि.आर. बरडे, ए. आर.बरडे ,अविनाश चव्हाण, सचिन मिसाळ,एस. पी.लबडे,एम.व्ही.कसाने,आर. जी.माघाडे,एम.एम.पवार.व्ही. जे.कसाने,एस.के.लांडे, अनंत खवले,महेंद्र राऊत, आकाश सिरसाठ ,रोहण भालेराव, व्ही. जी. खाजेकर, आसिफ शहा,एस.बी.पदार, आदी उपस्थित होते.

# मतदारसंघाच्या विकासाकरिता आराखडा तयार : अर्जुन खोतकर



जालना, ३ नोव्हेंबर : नंदनवन कॉलनी येथे सार्वजनिक सभामंडपाच्या बांधकामाचे भूमिपूजन सोहळा आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते पार पडला.

या प्रसंगी आमदार खोतकर यांनी उपस्थित बांधवांना संबोधित करताना सांगितले की, जालना विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाकरिता विकास आराखडा तयार केला आहे आणि त्या दिशेने सातत्याने मार्गक्रमण करत आहे.

यावेळी आमदार अर्जुन खोतकर यांनी नंदनवन कॉलनीतील नागरिकांना दिलेला शब्द पाळत सभामंडपाच्या भूमिपूजनाची वचनपूर्ती केली.

गोकुळधाम परिसरातील रस्त्यांचे काम, पुष्पक नगर व मातोश्री कॉलनीतील रस्ते तसेच सर्व डी.पी. रोड व भूमिगत गटार विकासकामे याबाबत स्थानिक नागरिकांनीही समाधान व्यक्त केले

या प्रसंगी कार्यक्रमाला शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, गणेश शेठ राऊत, राहुल हिवराळे, किशोर पांगरकर, लक्ष्मण अवघड, संदीप साबळे, संतोष रासवे, शुभम देशमुख, शरद ढाकणे, राऊत मामा, प्रवीण जगताप, मेघराज चौधरी, संतोष रासवे तसेच स्थानिक परिसरातील महिला भगिनी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉक्टरांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आय एम ए तर्फे मशाल मोर्चा




तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर येथे सरकारी डॉक्टरांवरील छळ, ताण आणि अन्यायाच्या विरोधात आय एम ए, मार्ड आणि मॅग्मो या संघटनांच्या वतीने मशाल मोर्चाचे आयोजन करण्यात आले. डॉ. अनुपम टाकळकर यांच्या नेतृत्वाखाली सुमारे दोनशे डॉक्टरांनी या मोर्चात सहभाग घेतला.

आय एम ए हॉलपासून क्रांती चौकापर्यंत काढण्यात आलेल्या या मोर्चात डॉक्टरांनी हातात मशाली घेऊन गीींळलश षीं ॐ डारावर चींपवश आणि डरींश ींहश डरीींं अशा घोषणांनी वातावरण दणाणून सोडले.

आय एम ए अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांनी सांगितले की डॉक्टरांवरील अन्याय सहन केला जाणार नाही. डॉ. संपदा मुंडे यांचा मृत्यू ही वैयक्तिक घटना नसून संपूर्ण व्यवस्थेच्या अपयशाची निशाणी आहे. सरकारने डॉक्टरांच्या सुरक्षिततेसाठी कठोर कायदा आणावा आणि संपदा मुंडे यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी त्यांनी केली.

डॉक्टरांनी सरकारी सेवेत वाढलेला अतिभार, प्रशासकीय दबाव आणि मानसिक छळ यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. तसेच डॉक्टरांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र यंत्रणा स्थापन करावी आणि या प्रकरणाची जलद गती न्यायालयात सुनावणी व्हावी अशी मागणी करण्यात आली.या वेळी डॉ. संदीपन काले, डॉ. प्रशांत बडे, डॉ. नागेश सावरगावकर, डॉ. प्रकाश साबळे, डॉ. साजिद शेख, डॉ. अपर्णा जक्कल,डॉ. अनुपम टाकळकर, डॉ. योगेश लक्कस, डॉ. यशवंत गाडे, डॉ. शिवाजी पोळे, डॉ. संभाजी चिंतले, डॉ. असावरी ताकळकर, डॉ. अंजली गाडे, डॉ. बाबासाहेब उनवणे, डॉ. संजय खंडागळे. डॉ. सचिन पाटील, डॉ. स्वप्निल केंद्रे, डॉ. दीपक कव्हर, डॉ. चैतन्य ढावरे. उपस्थित होते .

## गार्गी बाय पीएनजीने Q2 FY25-26 मध्ये जबरदस्त वाढ नोंदवली

मुंबई : कंपनीने Q2 FY25-26 या तिमाहीत ४६.४५ कोटींची विक्री केली असून, ही मागील वर्षीच्या याच तिमाहीतील २२.९५ कोटींच्या तुलनेत १०२% वार्षिक वाढ दर्शवते. तसेच Q1 FY25-26 मधील २७.३१ कोटींच्या तुलनेत ७०% अनुक्रमिक वाढ झाली आहे. ही दमदार महसूल वाढ गार्गीच्या फॅशन ज्वेलरी क्षेत्रातील वाढत्या वर्चस्वाचे आणि नवीन प्रदेश व ग्राहकवर्गात विस्तार करण्याच्या यशस्वी धोरणाचे निदर्शक आहे.

या तिमाहीतील ऑपरेटिंग नफा १३.०१ कोटी इतका झाला असून, त्यात ८७.४% वार्षिक वाढ आणि १०५% तिमाही वाढ नोंदली गेली आहे. यावरून कंपनीची कार्यक्षमता आणि नफा मार्जिन सुधारणा स्पष्ट होते.

निव्वळ नफा १०.२७ कोटी इतका झाला असून, तो मागील वर्षीच्या याच तिमाहीतील ५.०९ कोटींच्या तुलनेत १०१% वाढलेला आहे आणि मागील तिमाहीच्या तुलनेत ९३.३७% वाढ दर्शवतो. हा परिणाम ब्रँडच्या वाढत्या लोकप्रियतेचा, खर्च नियंत्रणातील कार्यक्षमतेचा आणि सणासुदीच्या हंगामातील उत्कृष्ट कामगिरीचा परिपाक आहे.

या निकालांमुळे गार्गीने भारतातील सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या परवडणाऱ्या फॅशन ज्वेलरी ब्रँड्सपैकी एक म्हणून आपले स्थान आणखी मजबूत केले आहे. वाढीमागे ब्रँडच्या नव्या उत्पादन श्रेणी, नवीन स्टोअर्सची उघडणी आणि ऑफलाइन व डिजिटल दोन्ही माध्यमांना जोडणाऱ्या मजबूत ओम्नी-चॅनेल उपस्थितीचा मोठा वाटा आहे.

कंपनीच्या व्यवस्थापनाने सांगितले, ही दुसरी तिमाही गार्गीच्या वाढीच्या कहाणीतील आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे. उत्पादन डिझाइन, ब्रँड अनुभव आणि डिजिटल परिवर्तनावर आमचा लक्ष केंद्रित दृष्टिकोन आम्हाला विक्रमी कामगिरी देण्यास मदत झाला आहे. सणासुदीच्या काळात आम्ही ही वाढीची गती कायम ठेवू, असा आम्हाला विश्वास आहे.

## दुचाकी अपघातात एक जखमी



तभा वृत्तसेवा

कन्नड :- शहरातून जाणाऱ्या जुना राष्ट्रीय महामार्ग २४७ वर दुचाकी व अज्ञात वाहनाचाअपघात झाला असून ४२ वर्षीय इसम गंभीर जखमी झाला आहे

दुचाकी क्र.एच.एच. २० जी.एफ ८८८० वरून तुकाराम दामू जाधव वय ४२ वर्ष रा.शिरजापूर तांडा ता.कन्नड हे आपल्या घराकडे जात असताना कन्नडच्या दिशेने येणाऱ्या वाहनाने त्यांना कारखान्याच्या पुढे असलेल्या वळणावर जोराची धडक दिली या यात ते गंभीर जखमी झाले,स्थानिक नागरिकांनी त्यांना कन्नड ग्रामीण रुग्णालयाच्या रुग्णवाहिकेत रुग्णालयात दाखल केले वैद्यकीय अधिकारी डॉ.रुपाली पठारे यांनी प्राथमिक उपचार करून जाधव यांना जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे,

हा अपघातात दुचाकीचे मोठे नुकसान झाले कन्नड शहर पोलिस स्टेशन येथे अपघाताची नोंद घेण्यात आली आहे.


**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबादः**

### जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: २६१/२०२५.

अर्जदारः १) कादर बशीर मेवाती (पठाण), वय ६५ वर्षे, २) उमरखों बशीरखौं पठाण, वयः ६३ वर्षे, ३) खलील खाँ बशीर खॉ पठाण, ययः ४५ वर्षे, ४) गफार बशीर मेवाती (पठाण), यय- ५० वर्ष ५) सत्तार बशीर खॉ पठाण, वयः ४८ वर्षे, ६) शबनुरबी मस्तानखॉ पठाण, वयः ५२ वर्षे ७) हजराबी रहेमान मेवाती (पठाण), वयः ५२ वर्षे, ८) इम्रान रहेमान मेवाती (पठाण), वयः ३१ वर्षे, वरील सर्वांचा धंदाः शेती, रा. वेताळवाडी ता. सोयगांव जि. औरंगाबाद. ९) सायराबी जाकीर पठाण, वयः २९ वर्षे, रा. कठोरा बाजार, ता. भोकरदन, जि. जालना.

// विरुध्द //

गैरअर्जदारः-निरंक.

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अ‍ॅड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे बशीर खॉ चाँद खॉ मेवाती (पठाण) हे दिनांक १०/०२/२०२४ ला मौजे नांदगांव तांडा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असून त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः- २४/११/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : ०१/११/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक, सहाय्यक
दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव



कार्यालय
### जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर

सत्यमेव जयते
सहकार विभाग

**कार्यालयाचा पत्ताः** शक्ती सहकार इमारत, सीबीएस रोड, कार्तिकी हॉटेलसमोर, छत्रपती संभाजीनगर, दूरध्वनी क्र. ०२४०-२३३१०३७,
E-mail: ddr_agd@rediffmail.com

### जाहीर प्रगटन

पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था म. शिरसोली जळगाव या पतसंस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये वाजवी मूल्यांकन मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयात सादर केलेले आहे. पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था म. शिरसोली जळगाव यांनी वेळोवेळी वसुलीसाठी प्रयत्न करूनही वसुली होत नसल्याने, पतसंस्थेकडील तारण असलेली मालमत्तेचे वाजवी मूल्यांकन मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर केलेला आहे. सबब गैरअर्जदार यांना नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार एक संधी म्हणून सुनावणी देणे आवश्यक असल्याने, त्यांना जाहीर प्रगटनाद्वारे दैनिक तरुण भारत या वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यासाठी कार्यालयास बँकेने विनंती केलेली आहे.

**परिशिष्ट**

| अ. क्र | तपशील | राहण्याचा पूर्ण पत्ता |
|---|---|---|
| १ | श्री. रामगोपाल बन्सीलाल खंडेलवाल (कर्जदार) | रा. एन-५, प्लॉट नं. १०, गोदावरी बंगला, सिडको, छत्रपती संभाजीनगर |
| | श्री. नितीन अशोकराव पेडगावकर (जामीनदार) | रा. मोगरा, श्री गुरुसहानीनगर, सिडको, छत्रपती संभाजीनगर |
| | श्री. राजेश बाबुराव डोळे (जामीनदार) | रा. लक्ष्मी अपार्टमेंट, प्लॉट नं. ४, टेलीफोन ऑफिसजवळ, छत्रपती संभाजीनगर |
| २ | श्री. रामगोपाल बन्सीलाल खंडेलवाल (कर्जदार) | रा. एन-५, प्लॉट नं १०, गोदावरी बंगला, सिडको, छत्रपती संभाजीनगर |
| | श्री. नितीन अशोकराव पेडगावकर (जामीनदार) | रा. मोगरा, श्री गुरुसहानीनगर, सिडको, छत्रपती संभाजीनगर |
| | श्री. राजेश बाबुराव डोळे (जामीनदार) | रा. लक्ष्मी अपार्टमेंट, प्लॉट नं. ४, टेलीफोन ऑफिसजवळ, छत्रपती संभाजीनगर |

तरी वरील कर्जदार, जामीनदार यांना देऊन सूचित करण्यात येते की, त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून किंवा या कार्यालयास दि. १९.११.२०२५ रोजी ठीक दु. ३.०० वाजता सुनावणीसाठी या कार्यालयास स्वतः अगर त्यांनी प्रधिकृत केलेल्या वकिलामार्फत आपले म्हणणे सादर करावे. सदर तारखेस आपण उपस्थित न राहिल्यास आपले काही म्हणणे नाही, असे गृहीत धरून पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, याची आपण कृपया नोंद घ्यावी.

**स्थळ : छत्रपती संभाजीनगर**
**दिनांक : २७.१०.२०२५.**

**स्वाक्षरित/-**
**(समृत जाधव)**
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बालाजी मंदिरात ब्रह्मोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ नोव्हेंबर**

भगवान तिरुपती बालाजी संस्थानच्यां धर्तीवर बीडमधील श्री व्यंकटेश्वर बालाजी मंदिरात यंदा ५ ते १० नोव्हेंबर दरम्यान भव्य ब्रह्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे हे २० वे वर्ष असून, मागील दोन दशकांच्या धार्मिक परंपरेला यंदा अधिक भक्तिभावाचा साज चढणार आहे. मंदिर परिसर दिव्य रोषणाईने सजला असून, शहरासह जिल्हाभरातून भाविकांचा मोठा उत्साह दिसून येत आहे. दरम्यान रविवारी (दि.९) होणाऱ्या रथोत्सवात बाहुबली हनुमान, बाहुबली नरसिह्मा विशेष आकर्षण राहणार आहे.

२००४ साली बीड शहरात तिरुपती बालाजीच्या प्रतिमेसारखी मूर्ती स्थापित करून व्यंकटेश्वर बालाजी मंदिराची स्थापना करण्यात आली. तेव्हापासून दरवर्षी ब्रह्मोत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा होत आहे. भगवान ब्रह्मांनी आरंभ केलेल्या या परंपरेनुसार 'ब्रह्मोत्सव' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या सोहळ्याने गेल्या दोन दशकांत जिल्हाभरातील भाविकांना आध्यात्मिक उर्जा दिली आहे. तिरुपतीसारखीच धार्मिक शिस्त आणि विधी येथे पार पाडले जात असल्याने बीडच्या बालाजी मंदिरातील ब्रह्मोत्सवाने भाविकांच्या मनात खास स्थान मिळवले आहे. यंदाच्या ब्रह्मोत्सवात पाच दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार आहे. विशेष म्हणजे दररोज सकाळ-संध्याकाळ हवनपूजा, आरती, शोभायात्रा आणि तीर्थप्रसादाचे आयोजन केले गेले आहे. भगवान बालाजीच्या शेष वाहन, हंस वाहन, हनुमंत वाहन, गरुड वाहन, रथोत्सव



आणि अश्ववाहनावर निघणाऱ्या भव्य मिरवणुका या ब्रह्मोत्सवाचे विशेष आकर्षण ठरणार आहेत.

ब्रह्मोत्सवात बुधवारी (दि. ५ नोव्हेंबर) सायंकाळी सहा वाजता पुण्याहवाचनम् आणि अंकुरार्पणम् विधीने ब्रह्मोत्सवाची सुरुवात होणार आहे. गुरुवारी (दि. ६) सकाळी १० वाजता हवनपूजा व ध्वजारोहण कार्यक्रम पार पडेल. सायंकाळी ५ वाजता कलश स्थापना, साडेसात वाजता शेष वाहन शोभायात्रा आणि रात्री ९ वाजता महाआरती होईल. शुक्रवारी (दि. ७) सकाळी ८ वाजता हवनपूजा, तीर्थप्रसादम्, साडेनऊ वाजता हंस वाहन शोभायात्रा, ११ वाजता आरती, सायंकाळी साडेसात वाजता गरुड वाहन शोभायात्रा आणि रात्री ९ वाजता आरती आयोजित केली आहे. शनिवारी (दि. ८) सकाळी ८ वाजता हवनपूजा आणि तीर्थप्रसादम्, ९.३० वाजता हनुमंत वाहन शोभायात्रा, ११ वाजता आरती, तर सायंकाळी ५.३० वाजता कल्याणोत्सव होणार असून भगवान बालाजीचा माता पद्मावती व लक्ष्मीदेवीसोबत शुभविवाह लावण्यात येणार आहे. त्यानंतर साडेसात वाजता आरती होईल. रविवारी (दि. ९) सकाळी ८ वाजता हवनपूजा व तीर्थप्रसादम्, ९.३० ते १२.३० या वेळेत रथोत्सव, सायंकाळी साडेसात वाजता अश्ववाहन शोभायात्रा, आणि रात्री ९ वाजता महाआरती आयोजित आहे. कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री बालाजी मंदिर संस्थान व ब्रह्मोत्सव समिती, बीड यांनी केले आहे.

तिरुपतीच्या पुजाऱ्यांच्या हस्ते वैदिक विधी

ब्रह्मोत्सवातील सर्व विधी तिरुमला तिरुपती देवस्थानचे मुख्य पुजारी सीतारामचार्यलू स्वामीजी आणि वेदपाठशाळेचे उपाध्यक्ष श्रीधर स्वामीजी यांच्या हस्ते पार पडणार असून, त्यांच्याद्वारे होणारा वैदिक मंत्रोच्चार हा उत्सवाचा आध्यात्मिक केंद्रबिंदू ठरणार आहे. त्यांच्या उपस्थितीमुळे ब्रह्मोत्सवाचे आध्यात्मिक वातावरण अधिक मंगलमय होणार आहे.

पाच दिवस महाप्रसाद

उत्सवाच्या प्रत्येक दिवशी दुपारी १२.३० वाजता आणि रात्री ९.३० वाजता भाविकांसाठी महाप्रसाद वाटपाचे आयोजन करण्यात आले आहे. या काळात हजारो भाविकांच्या उपस्थितीची अपेक्षा असून, सर्व भक्तांना भोजन, तीर्थप्रसाद आणि पूजन विधीचा लाभ घेण्याचे आवाहन श्री बालाजी मंदिर संस्थान व ब्रह्मोत्सव समिती, बीड यांनी केले आहे.

## जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ नोव्हेंबर**

बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत आगामी काळात दि. ०४ नोव्हेंबर पासून कपिलधार यात्रा सुरु होत आहे.तसेच विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. १५ नोव्हेंबर २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

## जिल्हास्तर लोकशाही दिनात सहा अर्ज प्राप्त

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ नोव्हेंबर**

जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये महसूल विभाग ०४ अर्ज भूसंपादन ०१ अर्ज नगर पालीका प्रशासन ०१ अर्ज असे एकूण ०६ तक्रार अर्ज प्राप्त झाले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला.यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्यक कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी यांच्याकडे महसूल संबधित एकूण सहा तक्रार अर्ज जिल्हा लोकशाही दिनात प्राप्त झाले असून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अर्जावर सुनावणी घेऊन संबधित विभागास १५ दिवसात संबधित प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय कौतुकास्पद

## शेतकरी पुत्र तथा भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ नोव्हेंबर**

सध्या केंद्रामध्ये भारतीय जनता पार्टीचे मा श्री नरेंद्रजी भाई मोदी साहेब यांचे सरकार असून देशातील गोरगरीब सर्वसामान्य वंचित लोकांपर्यंत मोठ्या मोठ्या शासकीय योजना कशा पोहोचल्या जातील व त्यांना कसा लाभ मिळवून देण्यामध्ये यशस्वी ठरलेले मा पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी साहेब एक यशस्वी पंतप्रधान म्हणून सध्या जगभरामध्ये ओळखल्या जाऊ लागले आहेत.ते सातत्याने गोरगरीब लोकांना सर्व योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील व यशस्वी मा पंतप्रधान यांनी केलेले प्रयत्न सातत्याने यशस्वी होत.असून केंद्र सरकारच्या बाबतीत सर्वत्र जगभरा मधून कौतुक व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यामध्ये महायुतीचे सरकार असून या महायुतीचे कर्तव्यदक्ष आणि कर्तबदार सर्वांच्या मनामध्ये बसलेले देव देश आणि धर्म यासाठी सातत्याने आपले कर्तव्य पार पाडणारे असे उत्कृष्ट आणि सुसंस्कृत स्वतः वकील असलेले अभ्यासू व्यक्तिमत्व असलेले महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मा मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या बाबतीत येणाऱ्या २०२६ मध्ये पूर्णपणे कर्जमाफी करु असे अभ्यासपूर्वक वचन सर्व महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांना त्यांनी दिल्यामुळे शेतकऱ्यांना एक फार मोठा धीर त्यांनी दिला आहे. म्हणून या शेतकऱ्याच्या घेतलेल्या कर्जमाफीच्या निर्णयाच्या बाबतीत मा मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस साहेब यांच्या उत्कृष्ट कार्याचे बीड जिल्ह्यातील शेतकरी पुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी समाधान व्यक्त करून बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने व सर्व बीड जिल्ह्यातील तमाम शेतकऱ्यांच्या वतीने त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी महाराष्ट्रातील तमाम लाडक्या बहिणींसाठी लाडकी बहीण नावाची चांगल्या प्रकारची महाराष्ट्रातील गोरगरीब महिलांना माता भगिनींना एक आधार देणारी योजना सुरू केली आहे. तसेच दिव्यांग व्यक्तीच्या बाबतीत देखील त्यांनी एक हजार रुपये मानधन वाढवले आहे.आता दिव्यांग व्यक्तीला पहिले दीड हजार रुपये मासिक महिना मिळत होता परंतु देवा भाऊ यांनी एक हजार रुपयांची भर या योजनेमध्ये टाकल्यामुळे प्रत्येकी दिव्यांग व्यक्तीला संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून अडीच हजार रुपये महिना मिळू लागला आहे. याबाबतीत देखील महाराष्ट्रातील तमाम दिव्यांग बांधवांमधून देखील समाधान व्यक्त होत असल्याचे या प्रसिद्ध पत्रकाच्या माध्यमातून शेतकरी पुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे. येणाऱ्या भविष्य काळामध्ये आपण बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील खेड्यापाड्यांमध्ये जाऊन देखील भारतीय जनता पार्टीची शाखा सर्वत्र गावोगाव करणार आहोत.तसेच भारतीय जनता पार्टीचे कार्य देखील आपण सर्वसामान्य माणसांना या शाखा ओपनिंगच्या माध्यमातून सांगणार आहोत. आणि शेतकऱ्यांच्या घेतलेल्या कर्जमाफीच्या योजनेच्या निर्णयाच्या बाबतीत सर्व शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत असून आता पुढेही येणाऱ्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीची सत्ता महाराष्ट्र मध्ये सर्वत्र येईल व भविष्यात लोकहिताचे चांगल्या प्रकारे निर्णय घेणारे अभ्यासू व्यक्तिमत्व असलेले कायमस्वरूपी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देखील देवेंद्र जी फडणवीस साहेब हेच असावेत अशी चर्चा देखील आता सर्व शेतकरी बांधवांमधून होत आहे.असे प्रसिद्धस दिलेल्या पत्रकाच्या माध्यमातून शेतकरी पुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे तसेच रब्बी पिकाचा सर्व बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांनी आपापला विमा काढून स्वतःचा फायदा कसा होईल किंवा शासनाच्या धोरणामध्ये सहभागी होऊन रब्बीचा पीक विमा सर्व बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांनी मुद्दतीच्या आत आपापले पैसे भरावेत विमा काढून घ्यावा घ्यावा असे आवाहन शेतकरी पुत्र तथा भाजप नेते मा नवनाथ जी अण्णा शिरोळे पाटील यांनी केले आहे आणि भविष्यात देवा भाऊ नक्कीच शेतकऱ्यांना रब्बी पीक विमाच्या बाबती देखील विमा कंपनीच्या माध्यमातून भरपूर शेतकऱ्यांच्या हिताची व शेतकऱ्याला आर्थिक मदत करून देतील असा विश्वास ही या वेळी नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी व्यक्त केला व मा श्री देवा भाऊ फडणवीस साहेब यांच्या महायुती सरकारच्या बाबतीत समाधान व्यक्त केले .



यश ढाका हत्या प्रकरणातील सर्व आरोपी तात्काळ अटक करा या मागणीसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयावर आज जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला.यावेळी ढाका कुटूंबियांसह नागरिक उपस्थित होते. (छाया-कृष्णा शिंदे)

# 'कोटी'चा प्रकल्प, पण धारूरला पाण्यासाठी वणवण!

**प्रतिभा नगरमध्ये जुनी-नवीन पाईपलाईनच्या 'घोळात' नागरिक तहानलेले; दिवाळीतही पाण्याचा थेंब नाही. अभियंता वाघ आणि तांबवे यांच्यावर हलगर्जीपणाचा थेट ठपका.**

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.३ नोव्हेंबर**

किल्ले धारूर नगरपरिषदेच्या वतीने 'नगरोत्थान महाभभयान पाणीपुरवठा प्रकल्पा' अंतर्गत ६५ कोटी रुपये मंजूर करून कुंडलिका धरणातून पाणी आणले खरे, पण या प्रकल्पाचे काम शहरात 'पाणीदार' ऐवजी 'तहानलेले' चित्र निर्माण करत आहे. शहराच्या प्रतिभा नगर भागात तर गेल्या मार्च महिन्यापासून ते आजपर्यंत नागरिकांना पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. दिवाळीसारख्या सणातही पाणी न मिळाल्याने येथील महिला, वृद्ध आणि बालकांचे प्रचंड हाल झाले असून, नगरपरिषद प्रशासनावर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

जुनी पाईपलाईन तोडली, नवी कोरडीच!

पारदर्शक स्पष्टीकरण:

नवीन पाईपलाईनचा फटका: नगरोत्थान प्रकल्पांतर्गत मार्च महिन्यात प्रतिभा नगरमध्ये नवीन पाईपलाईन टाकण्यात आली. हे काम करत असताना, संबंधित कंत्राटदार (गुत्तेदार) यांच्या निष्काळजीपणामुळे शहरातील जुनी, कार्यरत पाईपलाईन अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात तोडण्यात (फुटली) आली.

दुरुस्तीकडे अक्षम्य दुर्लक्ष: जुनी पाईपलाईन फुटल्यानंतर ती तातडीने दुरुस्त करण्याची जबाबदारी असतानाही, कंत्राटदाराने किंवा नगरपरिषदेने याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. जुन्या पाईपलाईनवर अनेक नागरिकांचे कनेक्शन असल्यामुळे, ही पाईपलाईन आज मार्चपासून ते आजपर्यंत पाण्यासाठी कोरडीच आहे.

नवीन कनेक्शन, सात वेळा पाणी: ज्या नागरिकांनी नवीन नळ कनेक्शनसाठी घरपट्टी व नळपट्टी भरली, त्यांना नवीन पाईपलाईनमार्फत आजपर्यंत फक्त सात ते आठ वेळाच पाणी आले आहे. यातही दिवाळीच्या सणात पाण्याचा थेंबही न आल्याने नागरिकांचा संताप शिगेला पोहोचला आहे.

अधिकारी व गुत्तेदार जबाबदार; मुख्य अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

प्रतिभा नगरमधील नागरिक संतप्त होऊन मागणी करत आहेत की, जुनी पाईपलाईन फुटल्यास ती तत्काळ दुरुस्त करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची (गुत्तेदाराची) होती, पण त्याने जाणूनबुजून दुर्लक्ष केले.जबाबदार अधिकारी: पाणीपुरवठा अधिकारी अभियंता वाघ आणि त्यांचे सहकारी ऋषिकेश तांबवे यांना वारंवार फोनद्वारे, प्रत्यक्ष भेटून तसेच अर्जाद्वारे नागरिकांनी माहिती दिली. मात्र, त्यांनी या समस्येकडे हलगर्जीपणाने दुर्लक्ष केले. त्यांच्या हाताखालील रोजंदारीवरील (मजुरीवरील) कर्मचाऱ्यांचा निष्काळजीपणा तर कळस गाठणारा आहे.

हलगर्जी करणाऱ्यांवर कारवाईची मागणी: या हलगर्जीपणामुळे निष्पाप महिला, बालक आणि वृद्धांना पाण्यासाठी वंचित राहावे लागले आहे. त्यामुळे, निष्काळजीपणा करणाऱ्या रोजंदारी मजुरांना तातडीने सेवेतून काढून, त्यांच्या जागी कायमस्वरूपी व जबाबदार व्यक्तींची नेमणूक करावी.

गुत्तेदारावर प्रशासकीय कारवाई: जुनी पाईपलाईन दुरुस्त करण्याची जबाबदारी न पाळल्यास, संबंधित गुत्तेदारावर प्रशासकीय कारवाई करून त्यांच्याकडून तत्काळ दुरुस्ती करून घ्यावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल माहिती घेऊन एक समिती स्थापन करावी आणि पाणीपुरवठा अधिकारी वाघ आणि तांबवे यांच्यासह दोषी गुत्तेदार व रोजंदारी कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी संतप्त नागरिकांची होत आहे.

# 'पाणी नाही, विकास नाही, पण नगराध्यक्ष-नगरसेवक पदाचे दर ठरले!' -'पैसा' बोलतोय, 'धारूरचा विकास' गप्प आहे!

किल्ले धारूर: ( सुर्यकांत जगताप )नगरपरिषद किल्ले धारूरच्या आरक्षण सोडतीनंतर शहरात निवडणुकीच्या चर्चेला मोठे उधाण आले आहे. नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी प्रत्येक पक्षातून मोठी चढाओढ सुरू असून, मुलाखती, गट-चर्चा, पक्षप्रवेश अशा अनेक राजकीय घडामोडींनी धारूर सध्या गाजत आहे. मात्र, या सर्व राजकीय धामधुमीत शहराच्या मूलभूत प्रश्नांवर चर्चा होताना दिसत नाही. विशेष म्हणजे, गेल्या वीस-पंचवीस दिवसांपासून शहराला पाणीपुरवठा झालेला नसतानाही, मुख्य चर्चेचा विषय पाणीटंचाई नसून, निवडणुकीतील पैशांचा 'खेळ' हाच ठरत आहे.





आज आरक्षण सुटल्यापासून शहरातील प्रत्येक हॉटेल, चौक, दुकान आणि गल्लीत फक्त आगामी निवडणुकीचीच चर्चा रंगली आहे. नगराध्यक्ष कोण होणार? कोण किती खर्च करणार? याच बाबींवर सर्वाधिक बोलले जात आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, नगराध्यक्ष पदासाठी चक्क 'दर' ठरवले जात असल्याची चर्चा शहरात सुरू आहे. एका पक्षातून नगराध्यक्षपदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांमध्ये 'मी एक कोटी, दुसरा दीड कोटी, तिसरा अडीच कोटी, तर चौथा तीन कोटी खर्च करेन', अशा पैशांच्या स्पर्धेला उधाण आले आहे. केवळ नगराध्यक्षच नव्हे, तर नगरसेवक पदासाठीही २० लाख, २५ लाख, ३० लाख खर्च करण्याची तयारी इच्छुक उमेदवारांनी दर्शवली आहे. ही परिस्थिती केवळ एका पक्षापुरती मर्यादित नसून, सर्वच पक्षांतील प्रमुख इच्छुकांमध्ये अशीच चर्चा जोर धरू लागली आहे.

विकासाचा लेखाजोखा हरपला!

वास्तविक पाहता, या निवडणुकीच्या निमित्ताने गेल्या नऊ वर्षांतील नगरपरिषदेच्या कामाचा लेखाजोखा मांडणे आवश्यक होते. किल्ले धारूर नगरपरिषदेची निवडणूक होऊन नऊ वर्षे पूर्ण झाली आहेत. या नऊ वर्षांत पहिल्या पाच वर्षांत भाजपचे सरकार (नगरपरिषद सत्ता) होते आणि त्यानंतरची चार वर्षे प्रशासकीय राजवट होती. या काळात शहरात काय विकासकामे झाली, किती पूर्ण झाली आणि किती अर्धवट राहिली, यावर गंभीर चर्चा होणे अपेक्षित होते.

भाजपच्या पाच वर्षांच्या काळात नेमकी कोणती विकासाची कामे मार्गी लागली आणि ती पूर्णत्वास का गेली नाहीत? यावर बोलण्याऐवजी, फक्त पैशांच्या बळावर निवडणूक लढवण्याची मानसिकता तयार होताना दिसत आहे. विशेष म्हणजे, मागील चार वर्षांच्या प्रशासकीय काळात माजी नगरसेवक, विरोधी नगरसेवक किंवा कोणत्याही पक्षाचे नेते नगरपरिषदेच्या विकासासंदर्भात फिरकले नाहीत किंवा जनतेच्या हिताचे कोणतेही काम त्यांनी केले नाही, अशी शहरवासीयांची भावना आहे. त्यांनी फक्त 'पाहण्याची' भूमिका घेतल्याचे चित्र दिसत आहे.

ऐतिहासिक वसा धोक्यात!

किल्ले धारूर हे शहर ऐतिहासिक वसा आणि वारसा लाभलेले शहर म्हणून ओळखले जाते. जर अशा पद्धतीने निवडणुकीत पैशाचा 'खेळ' चालणार असेल, तर निवडून येणारे प्रतिनिधी शहराचा विकास काय करणार? त्यांनी खर्च केलेला पैसा ते व्याजासकट वसूल करतील, यात शंका नाही. याचा थेट परिणाम शहराच्या विकासावर होऊन, ऐतिहासिक धारूरचा नावलौकिक आणि वसा संपुष्टात येण्याची भीती निर्माण झाली आहे. नऊ वर्षांपासून झालेला विकास खुंटलेला असताना, भविष्यातही हीच स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे.

जनतेनेच परिवर्तन घडवावे!

येणाऱ्या निवडणुकीत अनेक नवीन मतदारही आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या पार्श्वभूमीवर, धारूरच्या सुजाण नागरिकांनी आणि मतदारांनी विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. जर मतदारांनी नगराध्यक्ष आणि नगरसेवकांचे पैशांचे आमिष स्वीकारले, तर धारूर शहराचा विकास निश्चितपणे खुंटेल.

आता वेळ आली आहे, परिवर्तन घडवण्याची! किल्ले धारूरच्या जनतेने या पैशाच्या जीवावर निवडणूक लढवू पाहणाऱ्या आणि गोरगरिबांच्या मतदानाची चेष्टा करणाऱ्या उमेदवारांना योग्य धडा शिकवावा. प्रामाणिक, निस्वार्थी आणि खऱ्या अर्थाने शहराचा विकास करण्याची तळमळ असलेल्या व्यक्तीला निवडून देणे, ही काळाची गरज आहे. तुम्ही निवडलेला प्रामाणिक प्रतिनिधीच शहरात चांगल्या सुख-सुविधा उपलब्ध करून देईल आणि येणाऱ्या पिढीसाठी एक विकसित धारूर निर्माण करेल.

अन्यथा, जर ही 'पैशाची स्पर्धा' अशीच चालू राहिली, तर आपला हा ऐतिहासिक किल्ले धारूर येणाऱ्या काळात केवळ 'इतिहास' बनून राहील! मतदारांनो, योग्य वेळी योग्य निर्णय घ्या आणि धारूरच्या विकासाची दिशा बदला!

## अग्रलेख...

# कॉँग्रेसची हताशा, विरोधकांच्या बोंबा

वारंवार चुका करून आणि अपयश पदरी पाडून घेण्यात काँग्रेस पक्ष पटाईत आहे. त्याचा परिणाम म्हणजे सर्वांत मोठे आयुष्य लाभलेला हा पक्ष पार रसातळाला जाण्याच्या स्थितीत आहे. याची सुरुवात खरे तर १९७५ मधील आणिबाणीपासूनच झाली, असे म्हणावे लागेल. देशाला स्वातंत्र्य मिळून जेमतेम पाव शतक पूर्ण झाले होते. अवघ्या २८ वर्षांपूर्वी साडेपाचशेच्या आसपास राजे-संस्थानिकांचा देश असलेल्या भारतात स्वातंत्र्यानंतर लोकशाहीची मुळे रुजली होती. लोकांना मूलभूत आणि राजकीय अधिकारांची जाणीव झाली होती. काँग्रेसच्या काळातील बेरोजगारी, महागाई आणि भ्रष्टाचाराला जनता कंटाळली होती. याविरोधात विद्यार्थ्यांसह सामान्य जनता रस्त्यावर उतरली होती. त्यातच १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत शासकीय यंत्रणेचा गैरवापर केल्याचा निर्णय अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला होता. इंदिरा गांधी यांनी राजीनामा द्यावा, यासाठी देशभरात आंदोलन सुरू झाले होते. जनतेच्या असंतोषाला सामोरे जात विरोधकांच्या मागण्यांचा विधायक पद्धतीने सामना करण्याऐवजी आणि समस्या सोडविण्याऐवजी त्यांनी पदाचा गैरवापर करीत जून १९७५ मध्ये देशात आणिबाणी लागू केली. लोकशाहीवर वरवंटा फिरविण्याचा हा प्रकार होता. याचा परिपाक म्हणजे काँग्रेसचा लोकाधार घटला, घटतच राहिला. काँग्रेसला लागलेली ओहोटी अजूनही थांबलेली नाही. इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर १९८४ मध्ये काँग्रेसला लोकसभेत मिळालेला बहुमताचा आकडा शेवटचा ठरला. त्यानंतरची घसरण सर्वज्ञात आहे. सतत एवढी निराशाजनक कामगिरी पदरात पडूनही काँग्रेस जनतेची भावना ओळखायला तयार नाही. लोकभावनेचा आदर करायला तयार नाही. ज्या समस्येमुळे देशाचे विभाजन झाले, ती समस्या समजून घेण्याचा आणि तिचे निरसन करण्याचा प्रयत्न या पक्षाने कधीही केला नाही. सातत्याने एका विशिष्ट वर्गाचे लांगूलचालन केल्याचे परिणाम हा पक्ष भोगत आहे. यामधून थोडा देखील धडा घ्यायला काँग्रेस तयार नाही. या पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी पुन्हा एकदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घातली गेली पाहिजे, असे वक्तव्य केले. त्यांचेच पुत्र, जे कर्नाटकातील काँग्रेस सरकारमध्ये मंत्री आहेत, ते प्रियांक खडगे यांनीही संघावर बंदी आणण्याची मागणी केली. एवढेच नव्हे तर सार्वजनिक ठिकाणी संघाच्या कार्यक्रमांवर बंदी घालणारा निर्णयही घेतला होता. अर्थात, न्यायालयाने काँग्रेस सरकारला फटकारत हा निर्णय म्हणजे मूलभूत अधिकाराचे उल्लंघन असल्याचे म्हटले आहे. वारंवार चुका करीत असल्याने काँग्रेस अनेक राज्यांत प्रादेशिक राजकारणातून तर जवळपास बाहेर फेकली गेली आहे. आज मोठ्या राज्यांमध्ये काँग्रेसला कुणीही विचारायला तयार नाही. प्रादेशिक पक्षांचे बोट धरून चालण्याची आणि त्यांच्या अटी व शर्थींवर निवडणूक लढविण्याची नामुष्की या पक्षावर आली आहे. उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, महाराष्ट्र, मध्यप्रदेश या मोठ्या राज्यांमध्ये तर काँग्रेसची अवस्था अतिशय दारुण झाली आहे. प्रादेशिक पक्ष काँग्रेसला बोटावर नाचवत आहेत. या पक्षात स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याची हिंमत उरली नाही. कारण, एकट्याने लढले तर उरलेसुरले अस्तित्व नष्ट होण्याची भीती आहे. प्रादेशिक अथवा राष्ट्रीय पातळीवर सत्ताधाऱ्यांना घेरण्यासाठी ठोस मुद्देही या पक्षाकडे नाहीत. जे मुद्दे हा पक्ष उचलतो, ते बहुतांशी निरर्थक असतात. विशिष्ट वर्गाला खूश ठेवण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला दूषणे देणे आणि हिंदुत्वाला विरोध करणे एवढेच काम हा पक्ष आता करीत आहे.

हिंदुत्वाला विरोध करता करता आज मुस्लिम वगळता एकाही समुदायाचा सामाजिक आधार काँग्रेसला उरलेला नाही. बिहारात यादव आणि मुस्लिमांचा पाठिंबा राष्ट्रीय जनता दलाला आहे. या दोन समूहांची एकूण टक्केवारी ३१ आहे. पण, इतर जातींचा पाठिंबा नितीशकुमार यांच्या जदयु आणि भारतीय जनता पक्षाला आहे. काँग्रेसकडे यातले काहीच नाही. सीमांचलमध्ये मुस्लिमांची संख्या धडकी भरविणारी आहे. पण, येथील राजकीय आखाड्यात असदुद्दीन ओवैसी उतरल्याने त्याचा फटका निश्चितच राजद आणि काँग्रेसलाच बसणार आहे. बिहारात काँग्रेसची जी स्थिती आहे, तशीच आता महाराष्ट्रात झाली आहे. लोकसभा असो वा विधानसभा निवडणूक, या पक्षाला आधारच उरलेला नाही. काँग्रेसला १९८५ मध्ये १६१ जागा जिंकत स्वबळावर सत्ता स्थापन करता आली होती. या घटनेला आज ४० वर्षे झाली आहेत. तेव्हापासून काँगेसला एकदाही बहुमत मिळालेले नाही. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत तर काँग्रेस पाचव्या क्रमांकावर फेकली गेली. एवढे होऊनही काँग्रेसचे राज्यातील नेते चिंतन करायला तयार नाहीत. सध्या कथित मतचोरीच्या आरोपावरून राज्यातील वातावरण तापलेले आहे. महाविकास आघाडीने निवडणूक आयोगाच्या विरोधात रान पेटविले आहे. दोनच दिवसांपूर्वी मुंबईत सत्याचा मोर्चा त्यांनी काढला. या मोर्चातही काँग्रेस सहभागी झाली होती; पण नाईलाजाने! खरंच या पक्षाची स्थिती फारच विचित्र झाली आहे. स्वतंत्र भूमिका घ्यावी की आघाडीत राहावे, हेही ठरविणे काँग्रेसला जड जात आहे. मुंबई महानगरपालिका मुख्यालयाजवळ झालेल्या सभेत सर्वत्र भगवे झेंडे दिसत होते. काँग्रेसचे बाळासाहेब थोरात आणि शरद पवार यांचीही भाषणे झालीत, पण भाव खाऊन गेले ते राज आणि उद्धव ठाकरे.

२०१४ पासून देशात एका नव्या राजकीय पिढीचा उदय झाला आहे. डोळे झाकून काँग्रेसलाच मते देणारी पिढी संपली आहे. जातिपातीचे राजकारण संपत चालले आहे. हिंदुत्वाची लाट आल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले. हिंदू धर्मातील सर्वच जाती एकत्र आल्यानेच मोदी सातत्याने तिसऱ्यांदा विजयी झाले आहेत. याचाच अर्थ आता हिंदू जागा झाला आहे. त्यामुळे केंद्र आणि राज्यात सगळे व्यवस्थित असले तरी मतचोरीच्या आरोपांची हवा काढून घेणे गरजेचे आहे. सध्या महाराष्ट्रात मतचोरीचे आरोप होत आहेत. हा मुद्दा पकडून विरोधकांनी रान पेटविले आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत मतांची चोरी केल्याचा नॅरेटिव्ह पसरविला जात आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही काँग्रेस आणि विरोधकांनी संविधान धोक्यात असल्याचा नॅरेटिव्ह जनतेत पसरविला होता. यात काहीही तथ्य नसल्याची जाणीव एव्हाना सर्वांना असली तरी त्याचा रालोआला फटका बसला, हे मान्य करावे लागेल. यावेळी महाविकास आघाडीने कथित मतचोरी आणि मतदारयाद्यांवरून निवडणूक आयोगाला आव्हान दिले आहे. मतदारयाद्यांमध्ये अनेकांची नावे दोनदा-तीनदा असल्याचा दावा करणारे पुरावे असल्याचा दावा राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे करीत आहेत. शेवटी सत्य बाहेर येईलच; पण, लोकांच्या मनात शंका राहूच नये. या विषयाकडे आयोगाने लक्ष देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र काही उत्तर प्रदेश अथवा बिहार नाही. येथील मतदार सुजाण आणि जागरूक आहेत. कार्यकारी मंडळाबरोबरच न्यायालये आणि निवडणूक आयोग हे लोकशाही व्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. या संवैधानिक संस्थांविषयी जनतेच्या मनात जरा सुद्धा शंका उत्पन्न होणे जोखमीचे आहे. काहीही झाले तरी लोकशाहीचे घटक असलेल्या या संस्था पूर्णपणे विश्वासार्ह असणे गरजेचे आहे. दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे १९९६ मधील संसदेतील भाषण अजरामर ठरले. सत्ताकारण होत राहील; हा देश आणि लोकशाही टिकली पाहिजे, हा त्यांच्या भाषणाचा गाभा होता. "सत्ता का खेल तो चलेगा, सरकारे आएगी, जाएगी, पार्टीयां बनेगी, बिगडेंगी, मगर ये देश रहना चाहिए, इस देश का लोकतंत्र अमर रहना चाहिए" या शब्दांमधून वाजपेयी यांचे सत्तेवरचे नव्हे तर लोकशाहीवरचे, या देशावरचे प्रचंड प्रेम आणि श्रद्धा असल्याचे दिसून आले होते. सत्ता नसल्याने काँग्रेस सैरभैर आणि हताश झाली आहे. त्यांचे मित्रपक्ष देखील अवसान गमावून बसले आहेत. निवडणूक प्रक्रियेबाबत संशय उत्पन्न करणे हाच जणू त्यांच्या अस्तित्वाचा आधार. तो काढून घ्यायला हवा म्हणजे काँग्रेस आणि कथित मित्रांच्या आरोपांतील हवा कायमची निघून जाईल, विरोधकांच्या बोंबा बंद होतील आणि त्यांना नवा मुद्दा शोधणे भागच पडेल!...

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# नितीश-लालू यांची शेवटची निवडणूक!



बिहारच्या राजकारणातील नितीशकुमार नावाचे नाणे कोणत्या बाजूने पडणार यावर राज्य विधानसभा निवडणुकीचे निकाल काही प्रमाणावर अवलंबून राहतील असे मानले जाते. बिहारचे राजकारण मागील काही दशकांपासून नितीशकुमार व लालूप्रसाद यादव या दोघांभोवती फिरत आहे. ही निवडणुक दोघांसाठीही शेवटची निवडणूक असेल असे सर्वसाधारणपणे मानले जाते. ५१ वर्षांपूर्वी जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनातून उदयास आलेले नितीशकुमार व लालूप्रसाद यादव कधीकाळी मित्र होते, सहयोगी होते. पण, लालूप्रसाद यादव यांच्या माफिया शैलीने एक दिवस नितीशकुमार यांना भाजप नेते लालकृष्ण अडवाणी यांच्या उंबरठ्यावर नेऊन उभे केले. जुन्या संसद भवनाच्या सेंट्रल हॉलबाहेर जमलेल्या पत्रकारांना नितीशकुमार यांनी आपण भाजपकडे का गेलो याचे विश्लेषण करताना सांगितलेले मुख्य कारण होते बिहारमधील माफियाराज. नंतर या दोघांचे राजकीय मार्ग वेगवेगळे झाले. लालूप्रसाद यादव काँग्रेसकडे गेले तर नितीशकुमार यांनी भाजपचा रस्ता धरला.

**शेवटची संधी** : २०२५ मध्ये होत असलेली ही विधानसभा निवडणूक लालूप्रसाद व नितीशकुमार दोघांचीही शेवटची निवडणूक आहे. लालूप्रसाद यादव यांचे सक्रिय राजकारण कमी झाले आहे. त्यांच्यावर पुन्हा काही गंभीर खटले दाखल झाले आहेत तर दुसरीकडे नितीशकुमार यांच्या मानसिक स्वास्थ्याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आपल्या आयुष्यातील या शेवटच्या लढतीत कोण कुणावर मात करतो यावर राजकीय समीक्षकांचे लक्ष लागले आहे.

नितीशकुमार यांच्या जनता दल युने भाजपसोबत युती केली आहे तर लालूप्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाने काँग्रेससोबत युती केली आहे. नितीशकुमार यांची विश्वसनीयता ही त्यांच्या पक्षाची सर्वांत जमेची बाजू असल्याचे मानली जात होती. मधल्या काळात नितीशकुमार यांनी ज्या राजकीय कोलांटउड्या मारल्या, त्याने त्यांच्या प्रतिमेला काहीसा तडा गेला आहे.

**लालूला झिडकारले** : लालूप्रसाद यादव यांनी १५ वर्षे सलग बिहारवर एकछत्र राज्य केले. पण नंतर त्यांच्या जंगलराजला कंटाळून जनतेने नितीशकुमार यांना कौल दिला. लालूप्रसाद यांच्या राजवटीत रात्री ७ नंतर बिहार बंद होत असे. विकास नावाचा मुद्दा संपला होता. कायदा सुव्यवस्था संपली होती. अपहरण हा रोजचा खेळ झाला होता. या साऱ्याला कंटाळून जनतेने नितीशकुमार यांना कौल दिला. एक धीरगंभीर नेता अशी त्यांची प्रतिमा होती. त्यानुसार त्यांनी कामही केले. राज्यातील कायदा-सुव्यवस्था स्थिती सुधारली. विकासाच्या कामांना गती देण्याचा प्रयत्न केला. राज्यातील दररोज घडणारे अपहरणनाट्य संपविले. मात्र हे सारे काही साध्य होऊन काही वर्षांचा काळ लोटला आहे. जनतेला आता आणखी नवे काहीतरी हवे आहे आणि त्यात मुख्य आहे - रोजगार!

**रोजगार-बेरोजगार** : बिहारमध्ये रोजगार नाही आणि यामुळे राज्यातील युवा वर्ग नाराज आहे. बिहारची जनताही आता नितीशकुमार यांच्या नेतृत्वाबाबत काहीशी उदासीन झाली आहे. एकीकडे नितीशकुमार यांची विकासपुरुष ही प्रतिमा आणि दुसरीकडे त्यांचे काहीसे निस्तेज नेतृत्व अशी स्थिती तयार झाली असून बिहारचा मतदार विकासपुरुष नितीशकुमार यांनाच मतदान करतो की त्याला त्यांचा कंटाळा आला असल्याने तो नवा पर्याय निवडतो याचा निवाडा या निवडणुकीत होणार आहे.

**नवे नेतृत्व** : बिहारच्या राजकारणात काही वर्षांपूर्वी लालूप्रसाद यादव यांचे सुपुत्र तेजस्वी यादव यांचा उदय झाला असून, मागील काही महिन्यांत त्यांच्या सभांना जोरदार प्रतिसाद मिळत आहे. मात्र हा प्रतिसाद मतांमध्ये परिवर्तित होईल वा नाही हा मात्र एक अनुत्तरित प्रश्न आहे. अगदी स्पष्ट शब्दात मांडावयाचे झाल्यास, बिहारची जनता लालूप्रसाद व नितीशकुमार दोघांचेही राजकारण संपवित तेजस्वी यादवला एक संधी देईल काय याचे उत्तर ही निवडणूक देणार आहे.

**निर्णायक एम** : बिहारच्या राजकारणात 'एम' घटक नेहमीच निर्णायक राहिलेला आहे. मुस्लिम, मनी पॉवर व मसल पॉवर म्हणजे बाहुबली हे तीन घटक बिहारच्या राजकारणाला प्रभावित करीत असत. यात यावेळी आणखी एका 'एम'ची भर पडली आहे तो म्हणजे महिला घटक. केंद्र सरकारने राबविलेल्या काही योजनांचा मोठा फायदा महिलांना मिळाला आहे. या साऱ्याचा फायदा भाजपला मिळेल काय असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. महिला घटकाने भाजपला साथ दिल्यास, निस्तेज झालेल्या नितीशकुमार यांच्यामुळे होणारे सत्तारूढ आघाडीचे नुकसान भरून निघेल असे राजकीय समीक्षकांना वाटते.

**राहुल गांधी घटक** : बिहारमधील मतदारयाद्यांना काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी एक मुद्दा बनविले होते. हा सारा विषय सर्वोच्च न्यायालयात गेला होता. प्रारंभी ६५ लाख मतदारांची नावे मतदारयाद्यांमधून काढली गेली होती. आता ४२ लाख मतदारांची नावे काढण्यात आली आहेत. निवडणुकीनंतर ४२ लाख मतदारांचा मुद्दा उपस्थित केला जाईल काय हा एक प्रश्न आताच विचारला जाऊ लागला आहे.

**याचिका नामंजूर** : सर्वोच्च न्यायालयाने मतदारयाद्यांमधील कथित गडबडींची चौकशी करण्यासाठी एक चौकशी समिती नेमावी अशी एक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. न्यायालयाने ती याचिका फेटाळून लावीत याचिकाकर्त्यास निवडणूक आयोगाकडे जाण्यास सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाने अगदी योग्य असा निर्णय घेतला आहे.

बिहारमध्ये राहुल गांधी यांच्या प्रचारसभांना प्रतिसाद मिळाला असल्याचे मानले जाते. तेजस्वी यादव व राहुल गांधी यांचा संयुक्त प्रचार दौरा विरोधी आघाडीस विजय मिळवून देईल असा विश्वास या आघाडीच्या नेत्यांना वाटत आहे.

**तुल्यबळ लढत** : बिहारच्या लढतीचे सध्याचे चित्र तरी तुल्यबळ असे आहे. नितीशकुमार यांची प्रतिमा ही सत्तारूढ आघाडीसाठी जमेची आणि उणेची बाजू ठरत आहे असे दिसते तर त्याचवेळी महिलांसाठी राबविण्यात आलेल्या योजना सत्तारूढ आघाडीसाठी जमेची बाजू ठरतील. विरोधी आघाडीचा विचार केल्यास तेजस्वी यादव-राहुल गांधी यांची जोडी या आघाडीसाठी जमेची बाजू आहे. मात्र, प्रत्यक्ष जमिनीवर दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते किती जोमाने व एकोप्याने काम करतात हे पाहणे महत्त्वाचे आहे.

**प्रशांत किशोर** : बिहार विधानसभा निवडणुकांची घोषणा होईपर्यंत प्रशांत किशोर यांच्या पक्षालाही राज्याच्या राजकारणातील महत्त्वाचा घटक मानले जात होते. सरकारमधील भ्रष्टाचाराला त्यांनी मुख्य मुद्दा बनविले होते. मात्र, त्यांनी स्वत: निवडणूक न लढविण्याचा निर्णय घेतला. याचा विपरीत परिणाम त्यांच्या कार्यकर्त्यांवर होत असून हा घटनाक्रम भाजपच्या पथ्यावर पडेल तसे मानले जाते. प्रशांत किशोर यांनी ताकदीने निवडणूक लढविली असती तर त्याचे काही प्रमाणात नुकसान भाजपला झाले असते असे म्हटले जात होते. बिहारमधील निकाल कसे असतील यावर राजकीय समीक्षकांमध्ये वेगवेगळी मते असली तरी एका मुद्यावर मात्र सर्वांचे एकमत आहे. तो म्हणजे ही लढत एकतर्फी नाही, तर तुल्यबळ आहे.

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# लग्नाची धामधूम

लग्न म्हटले म्हणजे नुसती लगबग, मग ती कामांची असो, खरेदीची असो, याद्या बनवण्याची असो... संपूर्ण घर कामाला लागतं. अगदी घराच्या रंगरंगोटीपासून सुरुवात असते. घराची रंगरंगोटी झाल्यानंतर धान्याची आणि सामानाची साठवणूक सुरू होते. एकेक सामान आपल्या गरजेनुसार आणि ऐपतीनुसार घरात येतं. लग्नाचे दिवस जवळ येताच दारात मांडव घातला जातो, दिव्यांच्या माळा लागतात, पाहुण्यांची वर्दळ वाढते, खाद्यपदार्थांचा खमंग सुवास दरवळत राहतो. जो-तो धावत असतो. या संपूर्ण कार्यक्रमाचा खऱ्या अर्थाने कोणी आनंद घेत असेल तर ते घरातील लहान मुलं असतात. त्यांच्याकडे फार मोठ्या जबाबदाऱ्या नसतात, छोटी छोटी कामेच दिली जातात. पण, त्यातही ते प्रचंड खुश असतात.

हा झाला घरातील मुलगा किंवा मुलगी यांच्या लग्नाचा प्रसंग. मात्र, आजपासून काही वर्षांआधी घरोघरी जेव्हा तुळशीचं लग्न लागायचं तेव्हाही वर सांगितल्याप्रमाणे नाही तरी त्याच्या ५० टक्के तरी माहौल असायचाच. दिवाळीनंतर लगेचच येणाऱ्या तुळशीच्या लग्नासाठी घरात नव्याने अनारसे, बेसनाचे लाडू बनायचे. आजही अनेक घरी साग्रसंगीत तुळशी विवाह साजरा होतो. कार्तिक द्वादशी तिथीपासून कार्तिक पौर्णिमेपर्यंत तुळशी विवाह केला जातो. मात्र, आज आपली ही परंपरा काहीशी मागे पडते आहे. तिचे पुनरुज्जीवन होणे गरजेचे आहे. कारण निसर्ग आणि देव या दोन्हींसोबत मानवाचे जवळचे नाते आहे. तुळशी विवाह या दोन्ही घटकांचा मिलनाचा अद्भुत सोहळा आहे. निसर्ग आणि देवाचे नाते किती अतूट आहे, हे दाखविण्याचे जणू प्रतीक हा सोहळा आहे. तसे आपल्या बहुतांश सणात निसर्ग आणि देव यांचा परस्पर संबंध आहेच. महादेवाला बेलाचे पान वाहणे असो किंवा गणपतीला दुर्वा अर्पण करणे असो, वडाच्या झाडाला सूत गुंडाळणे असो किंवा हरितालिकेला विविध पत्री वाहणे असो, प्रत्येक सणाचा निसर्गाशी कुठे ना कुठे संबंध आहेच. याच परंपरेतील तुळशी विवाहालादेखील निसर्ग आणि देव असे सुरेख अधिष्ठान आहे.

आजकाल देव म्हटले की नवीन पिढी फारशी रुची घेत नाही, असा अनुभव आहे. मात्र, हे पालकांवर अवलंबून आहे की आपण त्या पिढीला यामागील निसर्ग संगोपनाची, लोकांच्या एकत्रीकरणाची महत्ता कशी समजावून सांगतो. तुळशीचे छोटेसे रोप हवेतील प्रदूषण कमी करतं, आपल्या आजूबाजूचे वातावरण शुद्ध करून ऑक्सिजनचे प्रमाण वाढवतं. एवढेच नाही तर असंख्य लहान-मोठ्या आजारांवर तुळशीचा उपयोग अतिशय गुणकारी ठरतो. आयुर्वेदात याचे अपार महत्त्व सांगितले आहे. असे हे छोटेसे रोप किती महत्त्वाचे आहे, याविषयी घरातील नवीन पिढीला माहिती कळायला हवी. आज वाढत्या प्रदूषणावर आपले नियंत्रण नाही मात्र, त्याचे प्रमाण कमी करून वातावरण जास्तीत जास्त शुद्ध ठेवणे ही आपली जबाबदारी नक्कीच आहे. त्या दृष्टीने तुळशीचे रोप अतिशय उपयुक्त आहे. अशा या तुळशीचे नवे रोप आपण विवाहासाठी वापरतो. तिचा विवाह विष्णू अवतारातील शाळिग्रामासोबत लावला जातो. हे संपूर्ण विश्व सांभाळण्याचे काम जणू या दाम्पत्याने आपल्या शिरावर घेतले आहे. त्यामुळे त्यांच्या विवाहाचा सोहळा धडाक्यात करून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी आपल्याला मिळते. एरवी घरातील लग्नासाठी करतो तशीच पण, छोटेखानी तयारी या लग्नासाठी असते. उसाचा मांडव, सजवलेले तुळशी वृंदावन, त्यात नवीन तुळशीचे कोवळे रोप, बोर, भाजी, आवळ्याची पुडी, अंतरपाटाचे स्वच्छ, शुभ्र आणि स्वस्तिकाचे शुभचिन्ह असलेले वस्त्र, बेसनाचे शुद्ध तुपातील लाडू तसेच गोड अनारशांचा नैवेद्य असा सर्व थाट असतो. अक्षता वाटल्या जातात, मंगलाष्टके म्हटली जातात. विशेष म्हणजे, या निमित्ताने आपल्या आप्तस्वकीयांचे एकत्रीकरण होऊन आनंदपूर्ण संवादाची देवाणघेवाण होते. या आनंदाचा ठेवा आपण नकळत नवीन पिढीकडे हस्तांतरित करतो आणि तेदेखील पुढील वर्षी आनंदाने या सोहळ्याची तयारी करण्यापासून सहभागी होतात. हेच आहे खऱ्या अर्थाने परंपरेचे पाईक होणे. पुढील तीन दिवस चालणाऱ्या या आनंदोत्सवात आपणही या परंपरेचे वाहक होण्याचा संकल्प करूया.

७७५५९३८८२२

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# विवाहसंस्था; काल, आज आणि उद्या



विवाहसंस्थेचा भारतीय इतिहास अतिशय प्राचीन आहे. भारत हे एक अतिशय प्राचीन राष्ट्र असल्यामुळे सामाजिक सभ्यतेचा सर्वप्रथम उदय याच राष्ट्रात झाला. पूर्वीच्या काळी विवाह हा एक संस्कार होता. हिंदू धर्मामध्ये जे १६ संस्कार सांगितलेले आहेत त्यापैकी हा एक संस्कार आहे. यामध्ये वधूने करावयाचे कार्य आणि वराच्या जबाबदाऱ्या या सर्व गोष्टी निश्चित केलेल्या राहायच्या. विवाह हा गृहस्थाश्रमातील प्रवेश होता. धर्मामध्ये सांगितल्यानुसार, मानवाचे जीवन हे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या पुरुषार्थांवर आधारित असायला पाहिजे. गृहस्थाश्रम हा या पुरुषार्थांवर आधारित होता. यामध्ये अर्थ आणि काम यांची साधना धर्माच्या आधारावर केली जायची. विवाहाचे विविध प्रकार होते ज्यामध्ये ब्रह्म विवाह, दैव विवाह, आर्ष विवाह, प्रजापत्य विवाह, असुर विवाह, गांधर्व विवाह, राक्षस विवाह, पैशाच विवाह असे प्रकार होते. यामध्ये ब्रह्म, दैव, आर्ष आणि प्रजापत्य यांना चांगले मानले गेलेले होते, तर उर्वरित चार प्रकारांना चांगले मानले जात नव्हते.

आपल्या सर्वच देवी-देवतांची नावे जर आपण आठवली तर शंकर म्हटलं की आपल्याला पार्वती आठवते, विष्णू म्हटलं की लक्ष्मी आठवते, इंद्र म्हटलं की शची आठवते. त्यामुळे आपले देव सुद्धा विवाहित होते. जो मार्ग देवांनी दाखविलेला होता, तोच मार्ग ऋषींनी आणि समाजाने सुद्धा अनुसरलेला होता. वशिष्ठ ऋषींचे नाव आठवल्यावर आपल्याला त्यांची पत्नी अरुंधती हिचे नाव आठवते. याज्ञवल्क्य म्हटल्यावर मैत्रेयीचे नाव आठवते. अगस्ती ऋषींचे नाव घेतल्यावर लोपामुद्राचे नाव आठवते. अत्री-अनसूया, जमदग्नी-रेणुका ही नावे आपल्याला माहीत आहेत. आमच्या ऋषिमुनींनी सुद्धा जंगलामध्ये राहून आपले आश्रम स्थापन केले, स्वत: उत्तम गृहस्थ जीवन जगले आणि हजारो विद्यार्थ्यांना लौकिक व पारलौकिक शिक्षण दिले. मोठे मोठे राजे सुद्धा विवाहितच होते. हिंदू धर्मामध्ये घटस्फोट असा प्रकार नव्हता. पती आणि पत्नी दोघेही एकमेकांना पूरक कसे बनू, याचा प्रयत्न करायचे. विवाह हा करार नव्हता; त्यामुळे तो संस्काराचा भाग म्हणून आजन्म चालविला जायचा. दोन वेगवेगळ्या स्वभावाच्या व्यक्ती एकत्र आल्यावर सहवासाने प्रेम निर्माण होते, हा थोरामोठ्यांचा अनुभव होता. त्यांच्यामध्ये वादविवाद होणे हे सुद्धा नैसर्गिक मानले जायचे. कुठल्याही वादांत मोठ्यांनी मार्गदर्शन करून सुधारणा केली जायची. संततीच्या भविष्यासाठी पती-पत्नी दोघेही स्वत:मध्ये बदल करण्याचा प्रयत्न करायचे, त्यामुळे मुलांना आई-वडिलांचे प्रेम लाभायचे.

स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये १९५५ साली हिंदू कोड बिल अंमलात आणले गेले. त्यामध्ये हिंदू धर्मीयांमधील बहुपत्नीत्व समाप्त करून एकपत्नीत्व कायदेशीर करण्यात आले. कोणी आनंदाने तर कोणी कुरकुर करीत त्याचे स्वागत केले. परंतु आता विवाह जरी संस्काराचा भाग म्हणून केला जायचा, तरी सर्वांना माहिती झाले की हा एक करार आहे, कायद्याचा भाग आहे. पुढे ही भावना दृढ होत गेली. जमले तर ठीक, नाहीतर घटस्फोट. महिलांमध्ये शिक्षण, हक्क, समानता यासंबंधीची आधुनिक मते प्रसारित होऊ लागली. त्यामुळे आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह जन्मास येऊ लागले. सरकार आणि सामाजिक संघटनांनीही यांस प्रोत्साहन दिले. महिला शिक्षण, नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने घराबाहेर पडू लागल्या. त्यातून काही स्त्रियांनी आपल्या पसंतीचा जोडीदार निवडला. काही विवाह टिकले, काही संपले. समाजाने ही कल्पना आधी कुजबूज स्वरूपात आणि आता सहज स्वीकारली आहे. विवाहविच्छेद ही एक सर्वसामान्य घटना झाली आहे.

एका सुंदर मुलीच्या घटस्फोटाची गोष्ट प्रसिद्ध आहे. ती आणि तिचा नवरा दोघेही सुंदर व यशस्वी होते. न्यायालयात विचारल्यावर ती म्हणाली, "मला बंगलोरला ५० लाख पगाराची नोकरी मिळाली आहे; मी याला सोबत यायला सांगितले, पण तो पुण्यातच राहू इच्छितो. त्यामुळे आम्ही घटस्फोट घेत आहोत." या घटनेने नवीन पिढीचे दृष्टिकोन स्पष्ट केले. त्यांची नोकरी बदलण्यासाठी नवरा बदलण्याचीही तयारी आहे.

आता लिव्ह-इन रिलेशनशिपची सुरुवात झाली आहे. वर-वधू संशोधनासाठी विविध वेबसाईट्स उपलब्ध आहे. पूर्वी चहा-पोहे खाऊन जे काम व्हायचे ते आता ऑनलाईन होत आहे. पूर्वी जमवलेले विवाह हे बहुतांश मध्यस्थांच्या द्वारा ओळखी पाळखीतून जमविले जायचे, ते आता ऑनलाईन चॅटिंग आणि झूम मीटिंगच्या द्वारे जमविले जात आहेत. मूल नको असलेले जोडपे, म्हणजे डिंक कपल, हा समज समाजात रुजत आहे. दोघेही कमावते असल्याने, मुलं ही करीअरमधील अडथळा वाटू लागली आहेत. लग्न आणि जबाबदाऱ्या या सुद्धा काहींना अडथळा वाटतात. पुढील काळात नोकरी गमावणे हेही विवाहविच्छेदाचे एक कारण ठरू शकते. घर, फ्लॅट विकत घेण्याची जबाबदारी आता दोघांनी उचललेली आहे. त्यामुळे स्वत:ची गरज भागविण्यासाठी विवाह केले जात नाहीत. नवीन पिढीची पालक आणि नातेवाईकांची जबाबदारी घ्यायची इच्छा कमी होत चालली आहे. कदाचित पुढील काळात लोक मैत्रीतून किंवा प्रेमातून राहतील, पण विवाहाच्या बंधनात राहतीलच, असे नाही. "जर असेच राहू शकतो, तर विवाहाचे बंधन हवे कशाला आणि कायद्याच्या कटकटी नकोच," असा सूर उमटताना दिसतो. कदाचित विवाहसंस्थेचा मूळ उद्देश लक्षात घेऊन ते पुन्हा विवाहसंस्थेकडे सुद्धा आकर्षित होऊ शकतात. दोन्ही प्रकारच्या संभावना भविष्याच्या उदरात दडलेल्या आहेत.

गाडीला एक्सलेरेटर असणे आवश्यक आहे, कारण गती लागतेच. पण त्याला गिअर आणि ब्रेकही असावे लागतात; नाहीतर अपघात होऊ शकतो. तसेच नात्यांनाही नियंत्रणाची, संयमाची गरज आहे. आमच्या देवतांनी, ऋषिमुनींनी, महापुरुषांनी ही व्यवस्था फार प्राचीन काळापासून उभी केलेली आहे. विवाह हा संस्कार आहे, करार नाही हे लक्षात घेतले तरच विवाहसंस्था टिकू शकते. नोकरी करणे ही तडजोड आहे, तसेच संसार करणेही तडजोड आहे. एखाद्याचे दोष पाहिले, तर शंभर दोष दिसतात; गुण पाहतो म्हटले तर गुणही दिसतील. पण जसे वारंवार नोकरी बदलल्याने बायोडाटा खराब होतो, तसेच वारंवार संबंध तुटल्याने जीवनही विस्कळीत होते. मानवी नातेसंबंध समर्पण, त्याग आणि तडजोडीवर आधारित आहेत. हे ध्यानात घेतल्यास विवाहसंस्था अजून काही काळ स्थिर राहील आणि समाजाला त्याचे फायदे मिळतील. "घरोघर ज्ञानेश्वर जन्मावा, घरोघर शिवाजी जन्मावा" अशी इच्छा बाळगणाऱ्या लोकांनी विवाहसंस्थेला बळकटी देण्यासाठी काम करणे गरजेचे आहे. अन्यथा वृद्धाश्रम हा वृद्धांसाठी एकमेव पर्याय उरेल आणि भारत सरकारला अमेरिकेसारखे वृद्धाश्रम नियोजन करावे लागेल. समाजातील सुजाण लोकांनी समाजाचे मार्गदर्शन करणे आणि विवाह संस्थेला बळ देणे गरजेचे आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### आयडियाची कल्पना!

महाविकास आघाडीतर्फे १ नोव्हेंबरला मुंबईत सत्याचा मोर्चा काढण्यात आला. त्या मोर्चात उद्धव ठाकरे, राज ठाकरे यांच्यासह शरद पवार, बाळासाहेब थोरात, सुप्रिया सुळे हेही सहभागी झाले होते. मतदारयाद्या दुरुस्त झाल्याच पाहिजेत अशी त्यांची मागणी आहे. (अशीच मागणी महायुतीच्या नेत्यांनीही केली आहे.) तेथील सभेत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी दुबार मतदार दिसले की आधी त्यांना तिथेच बडवायचे आणि मग पोलिसांकडे सोपवायचे अशी आक्रमक भूमिका घेतली. अलिकडे थोड्याच वर्षांपूर्वी शरद पवार यांनी नवी मुंबई येथे माथाडी कामगारांच्या सभेत बोलताना, एका दिवसात दोन वेळा मतदान कसे करायचे, याबाबत एक आयडियाची कल्पना जाहीरपणे सांगितली होती: सकाळी सातारा जिल्ह्यात मतदान करायचे आणि बोटाची शाई पुसून लगोलग नवी मुंबईत येऊन दुबार मतदान करायचे! प्रचंड बहुमत प्राप्त करण्यामागील नार्कोसत्यच त्यांनी सांगितले होते! अशा अतिविशिष्ट प्रकारातील दुबार मतदार आढळल्यास ठाकरे बंधू त्यांचे काय करणार?

**अविनाश वाघ**/पुणे

## वाचक पत्रे

### प्रदूषणाने झालेले मृत्यू म्हणजे सार्वजनिक आरोग्य संकट

देशाची राजधानी दिल्ली आता प्रदूषणाचीही राजधानी बनली आहे. दिल्ली हे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर असल्याचा एक अहवाल मध्यंतरी आला होता. आता दिल्लीची विषारी हवा लोकांचा जीव घेत असल्याचा धक्कादायक अहवाल समोर आला आहे. तेथील सुमारे १५ टक्के रहिवासी प्रदूषणामुळे मरत आहेत. एका अभ्यासातून उघड झालेला हा अहवाल धक्कादायक आहे. हे आकडे २०२३ मध्ये अपेक्षित मृत्यूंवर आधारित आहेत. इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ मेट्रिक्स ॲण्ड इव्हाल्युएशनने १ नोव्हेंबर रोजी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार २०२३ मध्ये झालेल्या एकूण मृत्यूंपैकी १७ हजार १८८ रहिवाशांचा मृत्यू प्रदूषणामुळे झाला. याचाच अर्थ राजधानीत प्रत्येक सात पैकी एक मृत्यू हा प्रदूषणामुळे होतो. जर वर्षाला प्रदूषणामुळे १५ टक्के मृत्यू एकट्या दिल्लीत होत असतील तर देशात किती लोकांचा मृत्यू प्रदूषणामुळे होत असेल याची कल्पनाच न केलेली बरी. उच्च रक्तदाब आणि मधुमेहापेक्षाही प्रदूषणाने अधिक मृत्यू होतो याला सार्वजनिक आरोग्य संकट म्हटले पाहिजे. वर्षाला १५ टक्के मृत्यू प्रदूषणाने होतात हा अहवाल धोक्याचा इशारा देणारा आहे. यावर वेळीच उपाय केले नाही तर ही आकडेवारी वाढण्याची शक्यता आहे त्यामुळेच वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांसाठी सम-विषमसारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करून ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल आणि प्रदूषणामुळे होणारे मृत्यूही कमी करता येईल.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-३१

सोमवार, ३ नोव्हेंबर २०२५

### विजयाचे पद पुढे टाकिले

विजयाचे पद पुढे टाकिले
मनांमनांतुनि करुनि जागरण
दुडुम् दुडुम् दुंदुभी घुमविले ॥धृ.॥

कालौघाला स्पर्श कशाचा
कमलदळाला जसा जलाचा ।
क्षणभर भाव न उदासतेचा
चंचल चित्तहि अचल बनविले ॥१॥

इतिहासाच्या संस्कारानी
विजयकथा त्या पुन्हा स्मरोनी ।
संघर्षाला सिद्ध होउनी
पहिले पाउल ठाम रोविले ॥२॥

प्रतीक भगवे या सर्वांचे
हिमशिखरावर डुलवायाचे ।
अखंड भारत निनाद साचे
हृदयाहृदयांतून गर्जले ॥३॥

व्हावी सेवा मातृभूमिची
मनी आस तर समर्पणाची ।
जीवनपूजा ध्वजराजाची
गुरुपूजेचे गान गाइले ॥४॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# परभणी जिल्ह्यातील २६५ अंगणवाड्या होणार स्मार्ट - महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

**रामप्रसाद कंठाळे**
**जिंतूर/प्रतिनिधी** - महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत राज्यातील अंगणवाड्यांचे आधुनिकीकरण करण्यासाठी ''स्मार्ट अंगणवाडी किट'' खरेदीस राज्य शासनाने मान्यता दिली आहे. या योजनेअंतर्गत परभणी जिल्ह्यातील सुमारे २६५ अंगणवाडी केंद्रांना मंजुरी देण्यात आली असून, या केंद्रांचे रूपांतर आदर्श आणि अत्याधुनिक सुविधांनी युक्त 'स्मार्ट अंगणवाड्यां'मध्ये करण्यात येणार आहे.

महिला व बालविकास राज्यमंत्री तथा परभणी जिल्हयाच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले की, ''मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी शिक्षण, आरोग्य आणि पोषण या तिन्ही घटकांचा समन्वय साधणारी स्मार्ट अंगणवाडी ही एक नवी क्रांती ठरणार आहे. स्मार्ट अंगणवाडी योजनेमुळे परभणी जिल्हयातील लहान मुलांना सुरक्षित, स्वच्छ आणि आनंददायी शिक्षणाचे वातावरण उपलब्ध होईल. मुलांच्या सर्वांगीण विकासासोबतच महिलांच्या सक्षमीकरणासाठी ही योजना महत्वपूर्ण ठरणार आहे. आपल्या परभणी जिल्हयासाठी ही अतिशय गौरवाची बाब असून जिल्हयातील २६५ अंगणवाड्या स्मार्ट होणार आहेत.'' या योजनेमुळे प्रत्येक अंगणवाडीत शिक्षण, आरोग्य, पोषण आहार, स्वच्छता व बालसंगोपनासाठी आवश्यक असणारे अत्याधुनिक साहित्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. यामुळे अंगणवाडी केंद्रांमध्ये मुलांसाठी आनंददायी, सुरक्षित आणि शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यास मदत होईल. परभणी जिल्हयातील परभणी, सेलू, जिंतूर, पूर्णा, मानवत, गंगाखेड, सोनपेठ, पाथरी, पालम या सर्व तालुक्यांतील अंगणवाड्या या योजनेत समाविष्ट आहेत. यामुळे ग्रामीण भागातील बालकांना दर्जेदार शिक्षण, पोषण आणि आरोग्यसेवा मिळणार असून स्थानिक अंगणवाड्या आधुनिक शिक्षण व आरोग्य विकासाचे केंद्र म्हणून विकसित होतील. या प्रकल्पामुळे बालकांच्या वाढीचा, आरोग्याचा व पोषणस्थितीचा मागोवा घेण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर होईल. महिला व बालविकास विभाग राज्यातील अंगणवाड्या सुसज्ज, आकर्षक आणि कार्यक्षम बनविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून 'स्मार्ट अंगणवाडी योजना' ही बालकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शासनाने उचललेले अत्यंत महत्त्वाचे आणि दूरदृष्टीचे पाऊल ठरणार आहे. परभणी जिल्हयातील स्मार्ट करावयाच्या अंगणवाडी केंद्रांचे नाव



तालुकानिहाय पुढीलप्रमाणे आहे. तालुका परभणी पारवा क्र.२, उमरी क्र.२,बोरवड बु क्र.१,पारवा क्र.३,कास्टगाव,पेडगाव क्र.१,ब्राम्हण गाव क्र. १,ब्राम्हण गाव क्र.३,ब्राम्हणगाव क्र.४,मांडाखळी क्र.३,साटला,झरी क्र.९,झरी क्र.६,सावगी खु-१,टाकळी क्र.६,सांवगी खु-२,सबर क्र.२, मांगणगाव क्र.२, मौजे नांदखेडा अंगणवाडी क्र.२,मौजे कोटमवाडी, मौजे कैलासवाडी अंगणवाडी, मौजे सायला (ख) अंगणवाडा-१, पिंपरी क्र.३, पाथरा क्र.२, पोखरणी क्र.७, तामसवाडी, पोखरणी क्र.४, आंबेटाकळी क्र.१, ताडपांगरी क्र.१, शिंगणापूर क्र.१, पिंगळी क्र.८, ब्रह्मपुरी क्र.१,ब्रह्मपुरी क्र. २, साळापुरी क्र.२,दैठणा क्र. ८,पेडगाव,तरोडा,पिंपळगाव समी,आरवी, पेगरगव्हाण, माळसोन्ना,इंदेवाडी, कार्ला. तालुका सेलू- डासाळा क्र. २,राधे धामणगाव, डासाळा क्र. २, डेंगळी पिंपळगाव क्र.२, गोमवाकडी, गोहगाव, करडगाव, कवडधन, डिग्रस खुर्द, वाकी, पिंपराळा, वाई क्र.१,वालूर क्र.२, वालूर क्र.४, वालूर क्र.१०, हातनूर क्र. २,बोरगाव जहागीर, हट्टा, कुपटा क्र.१, रावा, सिमणगाव क्र. २, सिमणगाव क्र. १,निरवाडी खुर्द, निरवाडी बुद्रक,कुंभारी, हिस्सी, गुगळी धामणगाव, धनेगाव,मोरेगाव, शिंदे टाकळी, शेलवाडी, निपाणी टाकळी, बोरकीनी, तिडी पिंपळगाव, शिराळा, आहेर बोरगाव, राजवाडी, आडगाव दराडे, काजळी रोहिना, वलंगवाडी, केमापूर, पिंपरी खुर्द, पिंपरी बुद्रुक, माले टाकळी. तालुका जिंतूर कुंभारी, दुधगांव क्र. १, कौसडी क्र. ७, धानोरा (बु) क्र. १, धानोरा (बु) क्र. २, वरुड (नृ) क्र. २, वरुड क्र. ३, कौसडी क्र. ५, चारठाणा क्र. ७, चारठाणा क्र. ४, नागनगाव, कडसावंगी, आडगाव (बा) क्र.१, जवळा (खु), कोक क्र.१कोक क्र. २, मुडा क्र.१, हनवतखेडा, आसेगाव क्र. ०२, करवली, माथला, सोन्ना, इटाली क्र.२, जोगवाडा क्र. ३, सोनापुर क्र.१, रिडज क्र. १, पिंपळगाव क्र.. १ (गा), दुधनगाव, चामणी, चिंचोली काळे, पोखर्णी तांडा, देहेगाव क्र.१,वडाळी, सावंगी (म्हा) क्र. १, हिवरखेडा,भोसी क्र. १, चौंधरणी, कसर,सोरजा क्र. १, मानधानी, वाघी धा, कोठा, बामणी बु.,निवळी बु., गणपुर, हलविरा, मानकेश्वर (चा), डोहरा, गोंधळा, शेक, अकोली, माक,सावरगाव,सोस, येसेगाव, बलसा. तालुका पुर्णा - वझर क्र.१,कळगाव क्र. १,गौर क्र. ३, धनगर टाकळी क्र.१,आलेगाव क्र.१, हिवरा क्र.१, पिंपळालोंखडे,रुजक्र.१,कानडखेडा क्र. १, कान्हेगाव क्र.१, ताडकळस क्र. ३, हटकरवाडी, कानडखेडा, फुकटगाव, एरंडेश्वर क्र. १, एरंडेश्वर क्र. ४,कातनेश्वर क्र. ४.

तालुका मानवत अटोळा, कोथाळा क्र.१, कोथाळा क्र.२,सावंगी मगर क्र.२, गोगलगाव क्र.२,देवलगाव क्र.१, रुढी क्र.२,केकर जवळा क्र.१, केकर जवळा क्र.२, खडकवाडी,रत्नापुर,रामेटाकळी क्र.१, रामपुरी क्र.१,हाटकरवाडी क्र.१, लोहरा क्र.१, मंगरुळ पा. प क्र.४, इटाळा ब्र, खरबा, रामपुरी बु.,वांगी, थार, वझुर बु., हमदापुर,हटकरवाडा,रामेटाकळी,जाब, हसनापुर,शहापूर. तालुका गंगाखेड धारखेड क्र.१,धारासुर क्र.३, सायाळा क्र.२, खंडाळी क्र.२, मरडसगाव क्र.१, बोर्ड क्र.२, कोद्री क्र.१, कोद्री क्र.२, माखणी क्र.३, बडवणी क्र.२, इसाद क्र.५, महातपुरी क्र.५, मौजे खळी, मौजे डोंगरगाव, मौजे अकोली,मौजे मानकादेवी,मौजे तांदुळवाडी,मौजे बडवणी, मौजे सांगळेवाडी, मौजे भेंडवाडी,मौजे सलमोहा,मौजे डोंगरजवळा,मौजे माखणी, मौजे खंडाळी, मौजे वाथा,मौजे वलवाडी,मौजे कासारवाडा,मौजे ढवळकवाडी,मौजे महातपुरी, मौजे वनपिंपळा, मौजे पांगळा.

तालुका सोनपेठ डिघोळ क्र.४, धामोनी क्र.१, वाघलगाव,थडीउक्कडगाव, गंगापिंप्री, वाडी पिंपळगाव, शेळगाव क्र.३, शेळगाव क्र.२,नरवाडी क्र.१,निळा क्र.१,वंदन क्र.१, करम तांडा, चतुर नाईक तांडा, उखळी क्र.२, पोहडूळ,पांहडूळतांडा, बनवाडी. तालुका पाथरी - गोपेगाव क्र.१,कासापुरी, लिंबा क्र.४,देवनांद्रा क्र.४, रेनापुर क्र.१, तूरा क्र.१, टाकळगव्हाण, हादगाव क्र.२, रामपूरी क्र.३, मरडसगाव क्र.१, बाभळगाव क्र.४, विटा क्र.१, खर्डा क्र.१, बाभळगाव क्र.२. तालुका पालम -फरकंडा क्र.१, गुळखंड, आरखेड क्र.१, फळा क्र.१, पेठ शिवनी क्र.३, सातेगाव क्र.१,शेख राजुर क्र.२, पेठपिंपळगाव क्र.३, वनभुजवाडी, आडगाव,नाव्हलगाव,चाटोरी क्र.४, बदरवाडी, खड़ी क्र.१,तांदुळवाडी क्र.१, पेंडू खु. क्र.१. अशा प्रकारे हे सर्व करण्यात आलेलेआहे.

## संक्षिप्त वृत्त...

### श्रीदत्त क्षेत्र कारंजा ते गाणगापूर पालखी रथयात्रेचे पाथरी व मानवतला आगमन




**मानवत प्रतिनिधी** - गुरुतत्त्व प्रदीप आयोजित श्रीदत्तक्षेत्र कारंजा ते श्रीक्षेत्र गाणगापूर जाणाऱ्या पालखी रथयात्रेचे सोमवारी तारीख ३ पाथरी व मानवत शहरात आगमन होत आहे.

परभणीच्या श्रीक्षेत्र दत्तधाम चे पिठाधीश स्वामी मकरंद महाराज यांच्या नेतृत्वाखाली २६ ऑक्टोबर पासून कारंजा येथून सदरील रथयात्रा निघाली असून गाणगापूर येथे जात आहे. गाणगापूर येथे २५ डिसेंबर ते २ जानेवारी पर्यंत सव्वा लक्ष भोजन सहित सिद्धग्रंथ श्रीगुरुचरित्र सारामृत पारायण, श्रीगुरुचरित्र कथामृत व नाम भक्ती सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. श्रीगुरुचरित्र पारायणासाठी २२०० भाविकांनी नोंदणी केली आहे.

सोमवारी ता ३ पाथरी येथे दुपारी ४ वाजता तर सायंकाळी ६ वाजता मानवत शहरात पालखीचे आगमन होणार आहे. महाराणाप्रताप चौकात पालखी यात्रेचे स्वागत केले जाणार असून बसस्थानक ते मुख्य रस्त्याने योगानंद महाराज स्थापित जुने दत्त मंदिरात जाणार आहे. त्या ठिकाणी पालखीचा मुक्काम असणार आहे. शहरातील भाविक भक्तांनी पालखी सोहळ्यात सहभागी होऊन दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### कांबळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर एल्गार मोर्चा

**मानवत प्रतिनिधी** - शहरातील अतिवृष्टीग्रस्त नागरिकांना तातडीने नुकसानभरपाई मिळावी, या मागणीसाठी माजी नगरसेवक सुशिल कांबळे (मानखेडकर) यांच्या नेतृत्वाखाली आज सोमवार (दि.०३) नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोठा एल्गार मोर्चा काढण्यात आला.

मागील महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरातील झोपडपट्टी वस्त्यांमध्ये पाणी शिरून शेकडो कुटुंबांचे संसार उध्वस्त झाले. अनेक घरांची पडझड झाली, तर अन्नधान्य, कपडे आणि घरगुती साहित्याचे प्रचंड नुकसान झाले. या आपत्तीमुळे गोरगरीब कष्टकरी नागरिक हलाखीच्या अवस्थेत जीवन जगत आहेत. प्रभाग क्र. १२ आणि १६ मधील भीमनगर, क्रांतीनगर, बाबर कॉलनी, जमजम कॉलनी, मंत्रीनगर, इंदिरा गांधी नगर, ताडेश्वर नगर, माऊली नगर, साकला प्लॉट, उदयनगर, आनंदनगर आणि विकासनगर या भागातील नागरिकांनी नुकसानभरपाईसाठी अनेकदा प्रशासनाकडे अर्ज, निवेदने, तसेच नुकसानाचे फोटो व व्हिडिओ सादर केले आहेत. मात्र, या सर्व प्रकरणांवर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, अशी खंत मोर्चेकऱ्यांनी व्यक्त केली. प्रशासनाच्या चालढकल वृत्तीचा निषेध म्हणून हा मोर्चा आयोजित करण्यात आला होता. या मोर्चाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन नुकसानग्रस्तांना त्वरित आर्थिक मदत आणि किमान एका महिन्याचे अन्नधान्य देण्याची मागणी करण्यात आली आहे.

### सेलूतील धोकादायक रस्त्यावर गतिरोधक बसवा; अन्यथा जलसमाधी आंदोलन करण्याचा इशारा

**सेलू,/प्रतिनिधी :** शहरातील रायगड कॉर्नर ते रेल्वे गेट हा रस्ता वाहतूकीसाठी अत्यंत धोकादायक झाला असून या रस्त्यावर तात्काळ गतिरोधक बसविण्यात यावेत, अन्यथा ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता मोरेगाव येथील दुधना नदीत जलसमाधी आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संतप्त सेलूकरांनी नगर परिषद मुख्याधिकारी आणि राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ बी चे अभियंता यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे. शहरातील रायगड कॉर्नर ते रेल्वे गेट हा रस्ता अत्यंत धोकादायक झाला असून, या रस्त्यावर गतिरोधक नसल्याने वाहने भरधाव वेगाने धावत आहेत. त्यामुळे या रस्त्यावर अनेक अपघात होऊन काही नागरिकांचा मृत्यू झाला आहे, तर काहींना कायमचे अपंगत्व आले आहे. या गंभीर परिस्थितीचा विचार करून तात्काळ गतिरोधक बसविण्यात यावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनावर जयसिंग शेळके, विनोद धापसे, मोहन मोरे, कृष्णा पडघन, वसंत आवटे, निशिकांत रोडगे, शाम रोडगे, मारोती ढोले, उध्दव डूबल आणि उत्तम लोखंडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### पाथरी बाजार नखाते यांच्याविरुध्द अविश्वास ठराव दाखल

**पाथरी,/प्रतिनिधी :** पाथरी येथील कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती अनिल नखाते यांच्या विरुध्द शुक्रवारी (दि.३१) बहुतांशी संचालकांनी अविश्वास ठराव दाखल केला. गेल्या काही महिन्यांपासून नखाते यांच्या विरोधात अविश्वास ठराव आणण्या संदर्भात हालचाली सुरु होत्या. मध्यंतरी त्या संबंधीचा ठरावसुध्दा दाखल होणार होता. परंतु, पुरेसे संख्याबळ न जोडले गेल्याने ठराव येण्यापूर्वीच बारगळला. मात्र, माजी आमदार व कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष बाबाजानी दुर्राणी यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि. ३१) बहुतांशी संचालकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे अविश्वास ठराव दाखल केला.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

### परभणी जिल्हयात रिमझिम पावसाने पुन्हा परिस्थिती हतबल

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हयात यावर्षी मोठया प्रमाणात पावसाने आपली हजेरी लावली होती. यावर्षी नियोजन सरासरीपेक्षा अधिकपट जिल्हयात पावसाचा परिणाम झाला. जिल्हयात यावेळी पावसामुळे ५२ टक्यांपर्यंत नुकसान झाले आहे. सरकारने जी मदत जाहिर केली अद्यापपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली नाही. उलट दिवाळी गोड होणार याआशेवर बळीराजा वाट पाहून होता मात्र त्यास पुन्हा एकदा पावसा प्रमाणे सरकारने देखील निराश केले आहे.सध्या सोयाबीन, कापूस काढणीचे काम जिल्हयात चांगलेच चालू आहे. परंतू गेल्या दोन ते दिवसापासून जिल्हयात रिमझिम अशा पावसाचेच आगमन झाले असल्याचे दिसूनयेत आहे. त्यातच या पावसाचा परिणाम आता सर्वच बाबतीत होत आहे त्यामुळे बळीराजा, सामान्य नागरिक आता या पावसामुळे पूर्णतः हवालदिल झाला असून त्याची हाती निराशाच लागली आहे.

## कोल्हावाडी येथे 'बळीराजा महोत्सव' गुणवंतांचा गौरव, ग्रामविकासाचा संकल्प

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**महेश दिशागत**
**मानवत,/प्रतिनिधी:** ग्रामविकास, स्थानिक संस्थांचे सक्षमीकरण आणि शेतकऱ्यांचा सन्मान या उद्देशाने मानवत तालुक्यातील कोल्हावाडी येथे 'बळीराजा महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत सुरू असलेल्या उपक्रमांचा हा महत्त्वपूर्ण भाग ठरला असून, गावकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग लाभला. या महोत्सवात गावातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंत नागरिकांचा तसेच पदोन्नती मिळालेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी ग्रामपातळीवर सुरू असलेल्या विकासकामांबरोबरच माझा गाव माझा अभिमान या भावनेतून ग्रामविकासाची दिशा ठरवण्यावर भर देण्यात आला.

**ग्रामगीतेचा आदर्श घेऊन कोल्हावाडी गावाची वाटचाल ओमप्रकाश यादव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर**
**कोल्हापूर : गावाच्या विकासाची खरी गाथा लोकसहभागात दडलेली आहे,असा विश्वास व्यक्त करत कोल्हावाडी ग्रामपंचायतीने 'ग्रामगीता'चा आदर्श घेत ग्रामविकासाचा नवा अध्याय सुरू केला आहे. ग्रामगीतेतील विचार अंगीकारून गावकऱ्यांनी स्वच्छता, पर्यावरण, प्लास्टिकमुक्ती, जलसंवर्धन आणि सामाजिक एकोपा या क्षेत्रात उल्लेखनीय उपक्रम हाती घेतले आहेत. ग्रामपंचायत प्रशासन आणि ग्रामस्थ यांचे सहकार्य यामुळे गावाचा चेहरा बदलत आहे.**
**ग्रामगीतेतील तत्त्वे केवळ वाचनापुरती नाहीत, ती आचरणात आणली पाहिजेत, असे ते म्हणाले. त्यांच्या प्रेरणेने कोल्हावाडीने स्वावलंबन, स्वच्छता आणि सामूहिक निर्णयप्रक्रियेला केंद्रस्थानी ठेवले आहे.असे प्रतिपादन उप मुख्य कार्यकारी अधिकारी ओमप्रकाश यादव यांनी केले. ग्रामसभांमध्ये गावकरी सक्रियपणे सहभागी होत असून, महिलांचा सहभाग लक्षणीय वाढला आहे.माझा गाव माझा अभिमान संकल्पनेतून ग्रामस्थांनी विकासाचे नवीन मापदंड निर्माण केले आहेत.**

कार्यक्रमाला कोल्हापूर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी ओमप्रकाश यादव, कृषी भूषण कांतराव झरीकर, छत्रपती संभाजीनगर येथील जीएसटी अधिकारी अंकुश नखाते, तसेच सरपंच जिजाबाई आठवे, ग्रामसेवक मनीषा माकुडे, विस्तार अधिकारी कानडे, बी.एम. यादव आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी कांतराव झरीकर , अंकुश नखाते यांचे मार्गदर्शन झाले याप्रसंगी मार्गदर्शन करताना सांगितले की,




ग्रामविकासासाठी केवळ निधी नव्हे तर गावकऱ्यांचा सहभाग आणि नियोजन ही खरी ताकद आहे. महिलांचा सहभाग वाढवून रोजगारनिर्मिती व सहकारातून सक्षमीकरण साधले पाहिजे.

महोत्सवाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक दिगंबर भिसे यांनी केले तर आभार ग्रामसेवक मनीषा माकुडे यांनी मानले. कार्यक्रमाला तालुक्यातील सरपंच, ग्रामसेवक, ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी मुख्याध्यापक बलभीम माथेले, सहशिक्षक दिगंबर भिसेयांनी मार्गदर्शन केले यावेळी ज्ञानदीप भिसे ,अमोल भिसे ऋषिकेश भिसे ,दत्तराव भिसे, यांनी यावेळी परिश्रम घेतले.

## विद्यार्थ्यांनो वेळेचे नियोजन करण्याची गरज- डॉ.तोळमारे

### दासोह शिष्यवृत्ती वितरण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न



**पूर्णा,/प्रतिनिधी-** शिक्षण व संस्कारातून मानवाचे मूल्यमापन होते.विद्यार्थ्यांनी अभ्यास करताना आपले ध्येय पुढे ठेवले पाहिजे.त्याच प्रमाणे शिक्षण घेताना वेळेला महत्व देणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन प्रा.डॉ.शशिकांत तोळमारे यांनी व्यक्त केले.

दासोह समिती व समस्त लिंगायत समाजाच्या वतीने दासोह शिष्यवृत्ती वितरण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.श्री गुरु बुध्दीस्वामी मठ संस्थान सभागृहात आयोजित या कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीसुर्य महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करन्यात आले. अध्यक्षस्थानी गंगाधर आप्पा महाजन तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ. शशिकांत तोळमारे उपस्थित होते. याप्रसंगी संतोष एकलारे ,प्रमोद एकलारे, अँड .राजेश भालेराव ,अशोक गडगिळे , विजया कापसे, विनायक देसाई, सतीश टाकळकर, संपत तेली ,विष्णू कदम, नंदकिशोर भारती ,गणेश पांचाळ आदि मान्यवर उपस्थिती होते. दहावी गुणवंत विद्यार्थी मनुजा मलिकार्जुन दांडेकर, सोहम संजय कस्तुरे, वेदिका शंकराप्पा भुरे, निशिगंधा ईश्वर स्वामी, ईश्वरी गुरु प्रसाद यशके, समीक्षा प्रकाश भालेराव.बारावी गुणवंत विद्यार्थी वरद वैजनाथ आप्पा एकलारे शुभम बबन आप्पा कापसे, ओमीत अरविंद महाजन,मेडिकल इंजिनिअरिंगला लागलेले विद्यार्थी प्रतीक्षा मल्लिकार्जुन केशे, साक्षी विजय भालेराव, दिपाली संजय भालेराव, साक्षी संजय कस्तुरे . प्रा. शिवराणी शशिकांत कुदमुळे,संतोष मुर्गे यांना उत्कृष्ट कर्मचारी म्हणून तर हर्षल महाजन यांना आयटीआयचे संचालक म्हणून निवड झाल्या बद्दल समाजाच्या वतीने सन्मान करन्यात आला. या वेळी कू. श्रुती महाजन या एम बी बी एस च्या विद्यार्थिनीने उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजय स्वामी यांनी तर सूत्रसंचालन नागनाथ बिबेकर आभार प्रदर्शन शिवप्रसाद देवणे यांनी केले.

### संतोष राठोड यांचा भाजपात प्रवेश



**जिंतूर,/प्रतिनिधी :** बंजारा समाजातील प्रभावी नेते आणि कुन्हाडी ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष राठोड यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) सोडून भारतीय जनता पक्षात (भाजप) प्रवेश केला आहे. परमणी येथे शनिवारी (दि. २५ ऑक्टोबर) झालेल्या भव्य कार्यक्रमात जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर, खासदार अशोक चव्हाण आणि माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांच्या उपस्थितीत त्यांनी जाहीर प्रवेश केला. या कार्यक्रमाला कुन्हाडी आणि वाधी धानोरा सर्कल मधील असंख्य कार्यकर्ते आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राठोड यांच्या प्रवेशामुळे या भागातील भाजपची संघट नात्मक ताकद वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, या प्रवेशा मुळे वाधी धानोरा सर्कल मधील माजी आमदार विजय भांबळे यांच्या गटाला एकप्रकारे धक्का बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. संतोष राठोड हे बंजारा समाजात मोठे प्रभावशाली व्यक्तिमत्व असून, ते राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या बंजारा ब्रिगेडियर सेलचे तालुका अध्यक्ष म्हणून काम पाहत होते. समाजातील सर्व सामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी नेहमी आघाडीवर राहणारे राठोड यांनी आपल्या कार्य काळात सामाजिक आणि विकासात्मक उपक्रमांवर भर दिला. त्यांच्या प्रवेशानंतर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत या सर्कलमध्ये मोठी चुरस निर्माण होण्याची शक्यता आहे. भाजपनेही त्यांच्या स्वागताने बंजारा समाजात आपले अस्तित्व अधिक बळकट करण्याचा प्रयत्न केल्याचे मानले. जात आहे. यावेळी बोलताना संतोष राठोड म्हणाले, ''पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वा खाली देश व राज्य प्रगतीच्या वाटेवर आहे. जनतेचे प्रश्न सोडविण्या साठी आणि विकासाच्या दिशेने अधिक प्रभावीपणे काम करण्यासाठी मी भाजपमध्ये प्रवेश केला आहे,'' असे ते म्हणाले. भाजपच्या जिल्हा नेतृत्वाने राठोड यांच्या प्रवेशाचे स्वागत करत, ''यांच्या नेतृत्वा मुळे वाधी धानोरा परिसरात भाजपला नवे बळ मिळेल,'' असा विश्वास व्यक्त केला.

CMYK

लातूर

# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## देवणी महावितरणचा भोंगळ कारभार; शेतकरी त्रस्त

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.२ नोव्हेंबर -**

तालुक्यातील बोरोळ येथील १०० केव्हीए बालुरे डी.पी. जळून दोन महिने उलटले तरी अद्याप नवीन डी.पी. बसविण्यात आलेली नाही. त्यामुळे गावातील काही भागात पाणीपुरवठा ठप्प झाला असून शेतकऱ्यांची शेतीकामेही पूर्णपणे ठप्प झाली आहेत.

संबंधित फिल्टर कार्यालयाशी ग्रामस्थांनी वारंवार संपर्क साधला, मात्र प्रत्येक वेळी ओडवाओडीवी अशी टाळाटाळ करणारी उत्तरे मिळत आहेत. स्थानिक अधिकाऱ्यांकडून या प्रकरणाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.



गावातील शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, पैसे दिल्यास त्वरित डी.पी. बसवली जाते, पण ज्यांनी पैसे दिले नाहीत त्यांना दोन-तीन महिने थांबवले जाते. त्यामुळे भ्रष्टाचार आणि बेफिकीरपणामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून पाणीपुरवठा देखील विस्कळीत झाला आहे.

वरिष्ठ अधिकारी या गैरप्रकाराची दखल घेणार आहेत का? जर तातडीने उपाययोजना केल्या नाहीत तर आम्ही महावितरण कार्यालयासमोर उपोषणास बसू, असा इशारा संतप्त शेतकऱ्यांनी दिला आहे.



### संक्षिप्त वृत्त...

#### मॉलिक्युलर बायोलॉजी व मायक्रोबियल जेनेटिक्स पुस्तकाचे पवारांच्या हस्ते विमोचन

**उदगीर, दि.२ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे माजी प्रभारी प्राचार्य व सध्या विद्या प्रतिष्ठान वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इंदापूरचे प्राचार्य डॉ. बाळकृष्ण संदीकर यांच्या मॉलिक्युलर बायोलॉजी व मायक्रोबियल जेनेटिक्स या पुस्तकाचे विद्या प्रतिष्ठान संस्थेचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. हा सोहळा विद्या प्रतिष्ठानच्या ५३ व्या वर्धापनदिनी बारामती येथील ग.दी. माडगूळकर सभागृहात पार पडला. यावेळी प्रतिभा पवार, ॲड. अशोक प्रभुणे, ॲड. नीलिमा गुजर, युगेंद्र पवार, सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे, विठ्ठलदास मनियार आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. संदीकर यांनी ३६ वर्षे महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात सूक्ष्मजीवशास्त्र विभागात सेवा बजावली असून, सध्या ते इंदापूर येथे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. या पुस्तकाच्या प्रकाशनाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात आले.

#### सिद्ध पादुका पुजन व दर्शन प्रवचन सोहळ्याचे नोव्हेंबर कळंब येथे आयोजन

**कळंब, दि.२ नोव्हेंबर -**

रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी जगद्गुरू रामानंदाचार्य दक्षिण पीठ, नाणीजधाम यांच्या सिद्ध पादुका पूजन व दर्शन प्रवचन सोहळ्याचे आयोजन डिकसळ येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयाच्या क्रीडा संकुलात दि. ९ नोव्हेंबर रोजी, रविवार सकाळी १० वाजता करण्यात आले आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने दि. ९ रोजी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौक, कळंब येथून भव्य-दिव्य शोभायात्रा निघणार आहे. या शोभायात्रेत कलशधारी महिला, ध्वजधारी पुरुष, भजनी मंडळे, संबळ पथक आणि विविध देखावे सादर होणार आहेत. रथातून जगद्गुरूश्रींच्या सिद्ध पादुका व प्रतिमेची मिरवणूक सकाळी ८ वाजता सुरू होईल. कार्यक्रम स्थळी शोभायात्रा पोहोचल्यावर जगद्गुरूश्रींच्या सिद्ध पादुकांचे पूजन होईल व त्यानंतर विविध सामाजिक उपक्रम राबवले जाणार आहेत. या धार्मिक सोहळ्यास जिल्ह्यातून ३० ते ४० हजार भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, सर्व भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन रामानंद संप्रदाय जिल्हा धाराशिव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

#### डिगोळचे उपसरपंच बाबासाहेब समर्थ पाटील यांचे अकाली निधन

**डिगोळ, दि.२ नोव्हेंबर -**



डिगोळ गावाचे उपसरपंच तसेच विविध कार्यकारी सोसायट्यांचे चेअरमन आणि सर्वांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे बाबासाहेब समर्थ पाटील यांचे अकाली निधन झाल्याची अत्यंत दुःखद वार्ता मिळाली आहे. त्यांच्या निधनाने गावावर शोककळा पसरली असून सामाजिक व राजकीय क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# औशातील औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांच्या समस्येवर चर्चा

### आ. अभिमन्यू पवार यांच्या पुढाकाराने बैठक यशस्वी

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२, नोव्हेंबर -**



औसा शहरातील औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांच्या समस्या सोडवून विकासाला गती देण्यासाठी शनिवार दि.३१ रोजी औसा येथे उद्योजक व प्लॉटधारकांसोबत एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत असलेल्या अडचणीची सोडवणुक करण्यासाठी महत्वपुर्ण चर्चा करण्यात आली. आ. अभिमन्यू पवार यांच्या पुढाकारामुळे येणाऱ्या समस्येवर तोडगा काढीत बैठक यशस्वी ठरली आहे.

या बैठकी दरम्यान उद्योजकांनी औसा एमआयडीसी मध्ये असलेले अनेक प्रश्न मांडले. त्यामध्ये राष्ट्रीय महामार्गावरून एमआयडीसीत प्रवेश करण्यासाठी केवळ एकच रस्ता असावा. अंतर्गत रस्त्यांची दुरावस्था, नाल्यांची देखभाल, परिसरातील बंद पडलेले पथदिवे, रात्रीच्या वेळी मद्यपींकडून होणारा त्रास, तसेच दर मंगळवारी जाणारी वीज,अशा अनेक समस्या या बैठकीत उद्योजकांनी मांडल्या.

आ. अभिमन्यू पवार यांनी उद्योजकांच्या सर्वच अडचणीवर सविस्तर चर्चा केली. काही तातडीच्या प्रश्नांवर बैठकीतच निर्णय घेण्यात आला. आणि संबंधित प्रशासनाला योग्य त्या सूचना देण्यात आल्या.यापूर्वी सुमारे दीड ते दोन वर्षांपूर्वी अशीच बैठक औसा एमआयडीसीत पार पडली होती. त्या वेळी विजेचा प्रश्न सर्वाधिक गंभीर होता. त्यावर आमदार अभिमन्यू पवार यांनी पुढाकार घेऊन अल्पावधीतच १.९१ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून ५ चत क्षमतेचे अतिरिक्त रोहित्र औसा एमआयडीसीसाठी मंजूर केले. आणि रोहित्र बसवून प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यात आल्यामुळे औसा एमआयडीसीचा विजेचा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न सोडवण्यात यश आले. या बैठकीत उपस्थित उद्योजकांनी आमदार पवार यांच्या या कामाबद्दल तसेच नवीन समस्यांवर तातडीने उपाययोजना केल्याबद्दल आभार मानले. आमदार पवार यांनीही यावेळी दिलेल्या सूचनांनुसार सर्व विषय प्राधान्याने मार्गी लावले जातील, अशी ग्वाही यावेळी दिली.या बैठकीतून औसा एमआयडीसीतील पायाभूत सुविधांच्या उन्नतीला आणि औद्योगिक वातावरणाच्या मजबुतीकरणाला नवी दिशा मिळेल, अशी आशा उपस्थिताकडून व्यक्त करण्यात आली.

यावेळी उद्योजक बालाप्रसाद बिदादा, एमआयडीसी उद्योजक संघटनेचे अध्यक्ष ॲड. श्रीकांत सुर्यवंशी, उपाध्यक्ष आयुब देशमुख, धनंजय इंगळे, महावितरण अभियंता प्रदीप काळे, नगरपालिका मुख्याधिकारी मंगेश चव्हाण, माजी नगरसेवक अक्रम खान, पोलिस निरीक्षक रेवणनाथ ढगाळे आदी उपस्थित होते.

### एमआयडीसीत स्थानिक उद्योजकांना प्राधान्य : ॲड. श्रीकांत सुर्यवंशी

औसा येथील एमआयडीसीमध्ये अंतर्गत मूलभूत सुविधा विकसित करण्यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी यापूर्वीही मोठा निधी उपलब्ध करून दिला असून, अलीकडील बैठकीत त्यांनी आणखी पाच कोटी रुपयांचा निधी देण्याची ग्वाही दिली आहे. सध्या औसा एमआयडीसीमध्ये शंभरहून अधिक उद्योग सुरू असून, या उद्योगांमुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होत आहे. आगामी काळात उर्वरित उद्योग सुरू करून आणखी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच औसा एमआयडीसीमध्ये स्थानिक उद्योजकांना प्राधान्य देण्यात येणार असल्याचे एमआयडीसी उद्योजक संघटनेचे अध्यक्ष ॲड. श्रीकांत सुर्यवंशी यांनी सांगितले.

## लातूर : जिल्हा बँक भरतीत भूमिपुत्रांसाठी ७० टक्के जागा राखीव

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२, नोव्हेंबर -**

राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या भरती प्रक्रियेत स्थानिक उमेदवारांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्ह्यातील रहिवाशांसाठी ७० टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय राज्य शासनाच्या सहकार विभागाने शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी घेतला आहे.

ही तरतूद सद्य चालू भरती प्रक्रियेलाही लागू राहणार असून, त्यामुळे जिल्ह्यांतील भूमिपुत्रांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निर्णयासाठी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी राज्याचे सहकारमंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. राज्यातील भरती प्रक्रिया पारदर्शक आणि वादमुक्त ठेवण्यासाठी शासनाने ऑनलाईन पद्धतीने भरती अनिवार्य केली असून, स्थानिकांना प्राधान्य देण्याच्या मागणीवर अखेर शासनाने शिक्कामोर्तब केले आहे.

या निर्णयाबद्दल स्थानिक उमेदवारांनी माजी आमदार धिरज देशमुख यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

### स्थानिकांना प्राधान्यचा आनंद : धिरज देशमुख



जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या भरती प्रक्रियेत स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय हा शेतकरी व भूमिपुत्रांच्या हक्काचा विजय असल्याची प्रतिक्रिया माजी आमदार तथा लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी दिली आहे.

## लोकांत राहणारा व जनमानसातला उमेदवार देणार : सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

### टाकळगाव येथे विद्युत वाहिनी स्थलांतरित कामाचा शुभारंभ...

**तभा वृत्तसेवा**
**अमहदपूर, दि.२, नोव्हेंबर -**

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत लोकांत राहणारा व जनमानसातला उमेदवार देणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी टाकळगाव तालुका अहमदपूर येथे केले. तालुक्यातील टाकळगाव येथे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या विद्युत वाहीनीच्या स्थलांतरित कामाचा शुभारंभ राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते टाकळगाव येथे संपन्न झाला यावेळी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर बापुदेव महाराज बेळगावकर, बाळासाहेब पाटील टाकळगावकर, तालुकाध्यक्ष शिवाजीराव देशमुख, निवृत्तीराव कांबळे, सुंदर साखरे, तुकाराम पाटील, दयानंद सुरवसे, शिवाजी पाटील, दीपकराव जाधव, बालाजी रोकडे, सतीश नवटके, नागोराव घोगरे, नानासाहेब घोगरे, साहेब शेख, बब्रुवान पठाण, जानखा पठाण, दिलीप पाटील, तानाजी घोगरे, हुसेन शेख, प्रकाशराव गोरडे, भारत शिंदे, वेंकटराव जांभळदरे, शेषराव चावरे, बाळासाहेब पवार, राम चव्हाण, नितीन पाटील, पांडू धडे, महावितरणचे माने साहेब, महाळकर, तानाजी घोगरे, नागोराव घोगरे, विशाल करंडे, प्रसन्न कानवटे, स्थानिक ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी, अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले की, या भागात विद्युत पोलची गरज लक्षात घेऊन ११ लक्ष रुपयांची ३५ पोल या ठिकाणी देण्यात आले असून यामुळे टाकळगावकरांची समस्या दूर होणार आहे. विधानसभा मतदारसंघातून



हरित क्रांती करायची असून दूध डेरीच्या माध्यमातून दुग्ध क्रांती सुरु आहे. यावर्षी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे.

शासन सर्वोतपरी मदत देण्याचा प्रयत्न करत आहे. आगामी काळात या भागात पुलांची कामे घेऊन दळणवळण सविस्तर करण्याचा माझा प्रयत्न असेल. आम्हाला राजकारण विकास करण्यासाठी करायचे आहे असे सहकार मंत्री ना. पाटील म्हणाले.

## राष्ट्रीय एकता दिवसानिमित्त अहमदपूरमध्ये पोलीस स्टेशनतर्फे एकता दौड संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२, नोव्हेंबर -**

भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आज, शुक्रवार दि.३१ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय एकता दौड पोलीस स्टेशन अहमदपूर यांच्या वतीने उत्साहात आयोजित करण्यात आली.

सकाळी नेमके ६ वाजता उपविभागीय दंडाधिकारी मंजुषा लटपटे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायभोळे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या दौडीची सुरुवात करण्यात आली. या दौडीत पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच परिसरातील 'मॉर्निंग वॉक' ग्रुप्सचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले. दौडचा मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा-सावरकर चौक-छत्रपती शिवाजी महाराज चौक-महात्मा गांधी महाविद्यालय-छत्रपती संभाजीराजे चौक-आझाद चौक-पोस्ट लाईन-पोलीस स्टेशन अहमदपूर असा ठरविण्यात आला होता.

दौडमध्ये गोविंद काळे, प्रगती काळे, तसेच छत्रपती शाहू राजे योगा ग्रुपचे अध्यक्ष एन. डी. राठोड, विलास पडिले, हिरामणी धसवाडीकर, एस.डी. वाघमारे, प्रा. जीवन गंगणे, संजय कलमे, पंढरी वाघमारे, निवृत्ती नागमोडे, बालाजी दुगाने, गणेश वाघमारे, ओमकार पाटील आदींनी सक्रिय सहभाग नोंदविला.

दौडचा समारोप पोलीस स्टेशन अहमदपूर येथे सकाळी ७:३० वाजता झाला. यावेळी उपविभागीय दंडाधिकारी मंजुषा लटपटे व उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायभोळे यांनी उपस्थितांना राष्ट्रीय एकता, ऐक्य आणि सरदार पटेल यांच्या कार्याची प्रेरणा याबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष केदासे, पोलीस उपनिरीक्षक रवी बुरकुले, आनंद श्रीमंगले, तसेच पोलीस कर्मचारी हनुमंत आरदवाड, भोपळे, आंबीलवाड, पांचाळ, शिंदे, घोरपडे, सारोळे, मामडगे, गुट्टे, साबळे, मुंडकर, बबन चपडे उपस्थित होते.

## श्री निलकंठेश्वर मंदिर संवर्धन कार्याचा आज शुभारंभ व महाआरती

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२, नोव्हेंबर -**

निलंगा शहराच्या आध्यात्मिक ओळखीचे प्रतीक असलेल्या श्री निलकंठेश्वर मंदिराच्या जतन व संवर्धन कार्याचा शुभारंभ आणि महाआरती सोमवार, दि. ३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता मंदिर परिसरात होणार आहे.

या पवित्र कार्याचा शुभारंभ महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या शुभहस्ते होणार असून, या सोहळ्याला माजी मंत्री आणि ज्येष्ठ नेते आ. संभाजीराव पाटील निलंगेकर प्रमुख उपस्थिती लाभणार आहेत.



श्री निलकंठेश्वर मंदिर हे निलंग्याच्या श्रद्धा, संस्कृती आणि भक्तीचे केंद्रस्थान आहे. या प्राचीन मंदिराच्या जीर्णोद्धार आणि संवर्धनाचे कार्य राज्य शासनाच्या सहकार्याने सुरू होत असून, मंदिराला 'संरक्षित स्मारक' म्हणून मान्यता मिळविण्याची प्रक्रिया सुरू आहे.

माजी मंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी या उपक्रमासाठी सातत्याने पाठपुरावा करून मंदिर विकासाची दिशा निश्चित केली आहे. या प्रकल्पामुळे सांस्कृतिक वारशाचे जतन, धार्मिक पर्यटनाचा विकास आणि भाविकांसाठी मूलभूत सुविधा उभारणी साध्य होणार आहे.

कार्यक्रमादरम्यान महाआरती व पूजन सोहळा भक्तिभावाने पार पडणार असून, परिसरातील नागरिक, भाविक आणि सामाजिक संस्थांना उपस्थित राहण्याचे आवाहन मंदिर विश्वस्त मंडळाने केले आहे. या प्रसंगी मंदिर विकास आराखड्याची माहितीही देण्यात येणार असून, मंत्रीमहोदय संवर्धन कार्याची प्रत्यक्ष पाहणी करतील. हा दिवस निलंग्याच्या इतिहासातील एक महत्त्वाचा क्षण ठरणार आहे.

## उदगीर न्यायालयात व्यसनमुक्ती जनजागृती पथनाट्याचे सादरीकरण

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२, नोव्हेंबर -**

तालुका विधी सेवा समिती आणि मातृभूमी महाविद्यालय, कस्तुराबाई नर्सिंग स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय परिसरात व्यसनमुक्ती जनजागृती पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रमाला जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी.बी. म्हलाटकर यांच्या प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच न्यायाधीश वाय.बी. गमे, एम.एस.एम.वाय. रचभारे, व्ही.बी. कांबळे, के.ए. यादव, बी.आर. झेंडे, तसेच विविध संघांचे पदाधिकारी उपस्थित होते. सतीश रे उस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्यातून व्यसनाचे दुष्परिणाम आणि कुटुंबावर होणारा परिणाम प्रभावीपणे मांडण्यात आला.

कार्यक्रमात प्राचार्या उषा कुलकर्णी, प्रा. गौतम जेवळीकर, निवृत्ती जवळे, किशोरकुमार सूर्यवंशी यांच्यासह विद्यार्थी कलाकार उपस्थित होते.

## तेरणा नदीपात्राच्या रुंदीकरण व खोलीकरणाची मागणी; जलसंपदा मंत्रींकडे निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२, नोव्हेंबर -**

तेरणा नदी काठावरील काटेरी झाडांच्या अडथळ्यांमुळे पावसाळ्यात वारंवार पुर येऊन उजनीसह नदीकाठावरील शेतकऱ्यांचे आणि व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. या पुराच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघावा आणि पाणीसाठ्यात वाढ होऊन शेतकऱ्यांना फायदा व्हावा, यासाठी तेरणा नदीच्या पात्राचे खोलीकरण आणि रुंदीकरण करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष राज पाटील यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.

उजनी हे औसा तालुक्यातील महत्त्वाचे ग्रामीण बाजारपेठेचे केंद्र असून येथील लोकसंख्या १५ ते २० हजार आहे. नदीकाठावरील काटेरी झाडांमुळे पावसाळ्यात थोडासा अधिक पाऊस झाला तरी पुराचा धोका निर्माण होतो. त्यामुळे दोन्ही बाजूंच्या शेतीतील पिकांचे भरून न येणारे नुकसान होते. पुराचे पाणी बाजारपेठेत घुसल्याने व्यापाऱ्यांचे साहित्य व मालाचे नुकसान होत असून, गावाच्या उत्तरेकडील घरांनाही फटका बसतो.

अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ येते, तर व्यापाऱ्यांना व्यवसाय बंद ठेवावा लागतो.

पुराच्या पाण्यामुळे शासकीय, निमशासकीय कार्यालये व बँका बंद ठेवाव्या लागतात, ज्यामुळे गावातील आर्थिक व्यवहार ठप्प होतात. दरवर्षी होणाऱ्या या नुकसानावर तोडगा म्हणून तेरणा नदीच्या धुता ते कमलपुर पट्ट्यातील नदीपात्राचे खोलीकरण व रुंदीकरण करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

तेरणा नदीचे खोलीकरण व रुंदीकरण झाल्यास पुराच्या पाण्याचा धोका कमी होईल आणि उजनी, धुता व कमालपुर या गावांतील सुमारे साडेचार हजार एकर शेतीचे नुकसान टळेल.

त्याचबरोबर नदीपात्रातील पाणीसाठा वाढून शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोठा फायदा होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### सकारात्मक प्रतिसाद : राज पाटील

राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा झाली. उजनीकरांच्या समस्येवर त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून या संकटातून नक्कीच दिलासा मिळेल, अशी अपेक्षा आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष राज पाटील यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# लोहगाव-नळदुर्ग रस्त्यावरील खड्डे फुलांनी भरून ग्रामस्थांचे गांधीगिरी आंदोलन

**तीन वर्षांपासून रखडले रस्त्याचे काम... बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधींकडे दुर्लक्षाचा आरोप...**

## तीव्र आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील लोहगाव-नळदुर्ग रस्त्याचे डांबरीकरण काम गेल्या तीन वर्षांपासून रखडले असून, रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने नागरिकांना प्रवास करताना अक्षरशः हाल होत आहेत. वारंवार लेखी व तोंडी तक्रारी करूनही प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून दखल घेतली गेली नाही.



या निष्क्रियतेविरोधात ग्रामस्थांनी २ नोव्हेंबर रोजी गांधीगिरीच्या पद्धतीने रस्त्यावरील खड्डे फुलांनी भरून आंदोलन केले. या आंदोलनाचा उद्देश म्हणजे झोपी गेलेल्या बांधकाम विभागाला जागे करणे, असे ग्रामस्थांनी सांगितले. गेल्या तीन वर्षांपूर्वी या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी मंजुरी मिळाली होती. गुत्तेदाराने प्रारंभी काही ठिकाणी खडी टाकून कच्चे बेड तयार केले, मात्र त्यानंतर काम बंद पडले. परिणामी पावसाळ्यात रस्ता उखडून खड्डेमय झाला आहे. उघडी खडी, मोठे खड्डे आणि असमतोल पृष्ठभागामुळे वाहनचालक, विद्यार्थी आणि व्यापाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. नळदुर्ग हे शिक्षणाचे तसेच बाजारपेठेचे प्रमुख केंद्र असल्याने या मार्गावरून दररोज मोठी वाहतूक होते. मात्र रस्त्याच्या दुरवस्थेमुळे दुचाकी घसरून होणाऱ्या अपघातांची संख्याही वाढली आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, बांधकाम विभाग आणि संबंधित लोकप्रतिनिधींकडून पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. ग्रामस्थांनी इशारा दिला आहे की, तात्काळ रस्त्याचे डांबरीकरण काम सुरू न झाल्यास यापुढे तीव्र आंदोलन छेडले जाईल.

या आंदोलनात ग्रामपंचायत सदस्य रंगनाथ दबडे, माजी सदस्य निजाम शेख, गुलाब नदाफ, लहु कांबळे, सतिश वाघमोडे, प्रदीप राठोड, स्वामिनाथ पांचाळ, पिंटु रड्डे, गोपाळ कोकरे, मोहन बनसोडे यांच्यासह अनेक ग्रामस्थ सहभागी झाले होते.

# ॲड. शीतल चव्हाण यांना कास्य; स्वरा चव्हाण हिला रौप्य पदक



थायलंडमध्ये झळकले उमरग्याचे नाव

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२ नोव्हेंबर -**

आखिल भारतीय सांस्कृतिक संघ (BSS) संचलित ग्लोबल कौन्सिल फॉर आर्ट अँड कल्चर (GCC) तसेच युनेस्को (UNESCO) यांच्या संयुक्त विद्यमाने थायलंड येथे आयोजित १५व्या कल्चरल ऑलिंपियाड ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स (COP) या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक स्पर्धेत उमरगा येथील ॲड. शीतल चव्हाण आणि त्यांची कन्या स्वरा चव्हाण यांनी भारताचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

ही स्पर्धा दि.२५ ते २९ ऑक्टोबर दरम्यान थायलंडच्या चोनबुरी येथील बुराफा विद्यापीठात पार पडली. यात २५० हून अधिक स्पर्धकांनी विविध वयोगट व कलाप्रकारांत सहभाग नोंदवला होता. स्पर्धेत व्होकल, इन्स्ट्रुमेंटल, फ्री स्टाईल, कॉन्टेम्परी, इथनिक, रिपोर्टरी, क्लासिकल आणि फोल्क अशा विविध प्रकारांचा समावेश होता. ॲड. शीतल चव्हाण यांनी खुल्या गटातून इथनिक नृत्यप्रकारात शिव तांडव व बम भोले या गाण्यांवर एकल नृत्य सादर करून प्रेक्षकांची दाद मिळवली, तर स्वरा चव्हाण हिने ज्युनिअर गटातून कॉन्टेम्परी नृत्यप्रकारात समूह नृत्याद्वारे नरसिंहा चित्रपटातील भक्तीपर गाण्यावर प्रभावी सादरीकरण केले.

यात स्वराने भक्त प्रल्हादाची भूमिका साकारली. दि.२८ ऑक्टोबर रोजी पटाया शहरातील हॉटेल ले बाली येथे झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात ॲड. शीतल चव्हाण यांना कास्य पदक, तर स्वरा चव्हाण हिला रौप्य पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

या यशाबद्दल उमरगा-लोहारा परिसरात अभिमानाची भावना व्यक्त होत असून, चव्हाण बाप-लेकीमुळे उमरग्याचे नाव थायलंडच्या भूमीत झळकले असे नागरिकांकडून गौरवोद्गार काढले जात आहेत.

# पंधरा दिवसांत ऊसाचे बिल अदा; एनव्हीपी शुगरचा वचनबद्धतेचा शब्द पाळला



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ नोव्हेंबर -**

धाराशिव तालुक्यातील जागजी येथील एनव्हीपी शुगर प्रा. लि. या कारखान्याच्या सन २०२५-२६ च्या द्वितीय गळीत हंगामातील पहिल्या पंधरवाड्यातील ऊसाचे बिल संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे.

चाचणी गळीत हंगामापासून सुरू झालेली ही चांगली परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली असून, शेतकऱ्यांनी पवनराजे लोकसमृद्धी मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटीच्या शाखेत जाऊन आपले बिल घ्यावे, असे आवाहन चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी केले आहे.



**एनव्हीपीने केला शेतकऱ्यांचा विश्वास संपादन...**

चाचणी हंगामात चेअरमन पाटील यांनी गाळप झालेल्या ऊसाचे बिल पंधरा दिवसांत अदा करण्याची घोषणा केली होती. यंदाही त्यांनी दिलेल्या शब्दाप्रमाणे पहिल्या पंधरवाड्यातील ऊसाचे प्रति टन २५०० रूपये प्रमाणे बिल तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले, ही उल्लेखनीय बाब आहे.

तोडणीनंतर अवघ्या पंधरा दिवसांत बिल अदा करणारा कारखाना म्हणून एनव्हीपी शुगरने शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला आहे. यावर्षीच्या हंगामात अतिवृष्टीमुळे काही अडचणी आल्या तरीही चेअरमन पाटील यांनी नियोजनबद्ध यंत्रणा राबवून हंगाम यशस्वी करण्यावर भर दिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा कल एनव्हीपी शुगरकडे अधिक वाढला आहे.

यापुढेही गाळपास आलेल्या ऊसाचे बिल पंधरा दिवसांत संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाईल, असे आश्वासन चेअरमन पाटील यांनी दिले.

# मुंबई-हैदराबाद महामार्ग की खड्ड्यांची राजधानी!

# सोलापूर-कर्नाटक सीमापर्यंतचा मार्ग बनला मृत्यूचा सापळा; खड्ड्यांचे पैसे वसूल, जीवांची किंमत शून्य!







**लोकप्रतिनिधींचा मौनव्रत कायम... जनता विचारते, हेच का कास?**

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२ नोव्हेंबर -**

एकीकडे केंद्र आणि राज्य सरकार 'विकासाच्या गप्पा' मारत असताना, दुसरीकडे महाराष्ट्रातील मुंबई-हैदराबाद महामार्गावरून मृत्यूचा रथ धावताना दिसतोय. सोलापूर ते कर्नाटक सीमालगतच्या या महामार्गावर आज रस्त्यांपेक्षा खड्ड्यांचीच संख्या अधिक, आणि तेही एवढे की, जणू या महामार्गाचे नाव आता खड्डा महामार्ग ठेवावे असे सुचवावे लागेल.

या महामार्गाला २०१२ साली मंजुरी मिळाली, पण प्रत्यक्षात काम २०१४ मध्ये सुरू झाले. ११ वर्षे उलटली, तरी या महामार्गाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. आणि जे काही झाले आहे, ते निकृष्ट दर्जाचे, बेफिकीर आणि भ्रष्टाचाराच्या दलदलीतून बाहेर आलेले काम असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

दररोज या महामार्गावरून हजारो वाहने धावत असतात; मात्र या रस्त्याच्या अवस्थेकडे पाहून वाटते - रस्ता आहे की रणांगण? कारण आतापर्यंत १००० हून अधिक नागरिकांनी या महामार्गावर आपला जीव गमावला आहे. मृत्यूंच्या या साखळीला जबाबदार कोण? हा प्रश्न आज प्रत्येक नागरिक विचारत आहेत. टोल वसुली मात्र सुरू आहे - तेही प्रचंड दराने. नागरिक विचारतात, टोल घेताना रस्ता दाखवा, खड्डा नव्हे! पण प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचे कान बहिरे झालेत का? हे कोडे आजही सुटलेले नाही. जनतेचे पैसे, जनतेचे जीव आणि खड्ड्यांचा हिशेब कुणाकडेही नाही.

स्थानिक नागरिकांनी महामार्गाच्या दुर्दशेविरोधात आंदोलनाचे हत्यार उगारले, तेव्हा प्रशासनाने घाईघाईत उड्डाण पुलाचे काम सुरू केले. पण काही दिवसातच त्या पुलावरही मोठमोठे खड्डे पडले. म्हणजे पुल असो वा रस्ता - निकृष्ट दर्जा, भ्रष्टाचार आणि बेदरकारपणा हेच तीन खांब या प्रकल्पाचे झाले आहेत.

महामार्गावर शेकडो अपघात, मृत्यू, नागरिकांचा संताप... तरीही स्थानिक आमदार, खासदार आणि पदाधिकारी मात्र तोंड झाकून बसले आहेत. जेव्हा निवडणुका येतात, तेव्हा याच महामार्गावर पोस्टरबाजी आणि बॅनरबाजी झळकते; पण आज नागरिक रस्त्यावर मरत असताना, हेच लोकप्रतिनिधी गायब झाले आहेत.

विकासाच्या नावाखाली मृत्यू विकला जातोय, हे लाजिरवाणं दृश्य आहे, असे नागरिकांचे तीव्र मत आहे. या महामार्गावरील अपघातामुळे धाराशिव जिल्ह्यातील जनतेत संताप उसळला आहे. खड्ड्यांच्या रस्त्यांवर जीव देणाऱ्यांसाठी जबाबदार कोण? या प्रश्नाचं उत्तर कोणी देणार नाही, हेच लोकांना माहीत आहे. मात्र, आता जनता गप्प राहणार नाही, असा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

महामार्ग विभाग, कंत्राटदार, लोकप्रतिनिधी - सगळ्यांची गाठ भ्रष्टाचाराने बांधलेली दिसते. नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर व ठेकेदारांवर तातडीने गुन्हे दाखल करावेत, अशी जनतेची ठाम मागणी आहे.

# रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना बियाणे व जैविक खतांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२ नोव्हेंबर -**

परंडा तालुक्यातील शेतकरी गटांना रब्बी हंगामासाठी आवश्यक बियाणे तसेच जिवाणू जैविक खते देण्यात आली. या उपक्रमाचे आयोजन तालुका कृषी अधिकारी नानासाहेब लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या कार्यक्रमात अधिकारी ॲड. पाटील, बी. हांगे, मंडळ अधिकारी संभाजीराजे माळी, सहायक कृषी अधिकारी विनोद भाग्यवंत, तालुका समन्वयक अमोल पाटील तसेच डायरेक्टर गणेशदादा नेटके यांची उपस्थिती होती.



ऑनलाइन पद्धतीने नोंद झालेल्या शेतकरी गटांना झोटोबॅक्टर स्पे., पीएसबी आणि केएमबी स्पे. यांच्या माध्यमातून प्रत्येकी १०० मि.ली. क्षमतेच्या जैविक खताच्या बाटल्या वाटप करण्यात आल्या. पाटील बुवा जिल्हा परिषद प्रोड्युसर कंपनी लि. भोंजा हवेली, तसेच श्री गणेश शेतकरी गट आणि श्री साई साम्राज्य शेतकरी गट यांच्या मार्गदर्शनाखाली जैविक शेंद्रीय शेतीसाठी बॅरल घेतलेल्या १०० शेतकऱ्यांना मोफत सी.पी.पी. कल्चर देण्यात आले.

हे सी.पी.पी. कल्चर फळबाग, केळी, पेरू, सीताफळ, पपई आदी पिकांसाठी ड्रिपद्वारे ड्रिचिंगसाठी तसेच रब्बी हंगामातील पिकांवर फवारणीसाठी उपयुक्त आहे. तसेच हे कुजलेले शेणखत, उकीरडा व घनकचरा प्रक्रियेसाठी प्रभावी असल्याचे कृषी विभागाने सांगितले.

कार्यक्रमादरम्यान शेतकऱ्यांना प्रत्यक्ष डेमो दाखवून सी.पी.पी. कल्चरचा वापर कसा करावा हे समजावून सांगण्यात आले. या उपक्रमाचा लाभ घेताना मोठ्या संख्येने युवा शेतकरी उपस्थित होते.

# धाराशिव शहरात गोवंशाची बेकायदेशीर वाहतूक उघड; दोन आरोपी ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ नोव्हेंबर -**

धाराशिव शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने गोवंशीय जनावरांची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या दोघांना रंगेहात पकडत ८ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई दि. ३० ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास वैराग नाका परिसरात करण्यात आली.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, विनोद त्र्यंबक काळदाते (वय ३७, रा. येळंब, ता. बार्शी, जि. सोलापूर) व रामेश्वर उर्फ आण्णा अभिमान गलांडे (वय ३६, रा. येळंब, ता. बार्शी, जि. सोलापूर) हे दोघे पिकअप क्रमांक चक-१३ एझ-०८४५ मध्ये गोवंशीय जातीच्या चार जर्सी गायी वाहतूक करत होते. ही वाहतूक कत्तलीसाठी व अत्यंत निर्दयतेने, पाणी-चाऱ्याची कोणतीही व्यवस्था न करता केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

धाराशिव शहर पोलीसांनी तात्काळ वैराग नाका परिसरात सापळा रचून ही वाहतूक पकडली. या कारवाईत सुमारे ८,६५,००० रुपयांचा एकूण मुद्देमाल, ज्यामध्ये जनावरे आणि वाहनाचा समावेश आहे, जप्त करण्यात आला.

या प्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात नमूद आरोपींविरुद्ध प्राण्यांवर क्रूरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईमुळे गोवंश तस्करांमध्ये एकच खळबळ उडाली असून, पुढील तपास पोलीसांकडून सुरू आहे.

# कासिफ सय्यद यांचे ईस्पोर्ट्स मध्ये उल्लेखनीय यश; आरळीच्या सुपुत्राची आंतरराष्ट्रीय पातळीवरही कौतुकास्पद कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२ नोव्हेंबर -**

तालुक्यातील आरळी बुद्रुक येथील कासिफ ख्वाजाभाई सय्यद यांनी नुकत्याच दिल्ली येथे पार पडलेल्या व्हॅलोरंट कॅम्पस क्वेस्ट एस थ्री या राष्ट्रीय पातळीवर झालेल्या महाविद्यालयीन ईस्पोर्ट्स या खेळात ग्रॅण्ड फायनलमध्ये विजेता टीमचे प्रतिनिधित्व केले आहे.

दिल्ली येथील अंतिम सामन्यात कासिफ ख्वाजाभाई सय्यद आणि त्यांची टीम अंतिम विजेती ठरली. नुकतेच भारत सरकारने ई स्पोर्ट्सला



ऑलम्पिक खेळ म्हणून मान्यता दिली आहे. कासिफ सय्यद सध्या मुंबई येथे स्थित असून सिंबायोसिस पुणे येथून एमबीएचे शिक्षण घेत आहे.

तो प्रोफेशनल ईस्पोर्ट प्लेअर असून आत्तापर्यंत त्याने अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधून देश विदेशात विजय मिळवत भारताचे प्रतिनिधित्व करतो आहे.

मुंबई येथील प्रसिद्ध आर्ट डिझायनर के. सय्यद म्हणजे आरळी बुद्रुक येथील ख्वाजाभाई सय्यद यांचा कासीफ मुलगा आहे.

**स्वतःला सिद्ध करण्यासाठी मेहनत आवश्यक**

क्रीडा प्रकार कोणताही असो त्यात स्वतःला सिद्ध करण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते, सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर गेममध्ये यश मिळवण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहे. हा खेळप्रकार ऑनलाईन आहे. ग्लोबल ई-स्पोर्ट्स गेम या खेळ प्रकारासाठी मी जगभरातील सिंगापूर, चीन, ब्राझील, थायलंड, इंडोनेशिया, जर्मनीअशा अनेक देशांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करून देशाची मान उंचावण्याचा प्रयत्न केला आहे. याचा मला अभिमान वाटतो.

**- कासिफ ख्वाजाभाई सय्यद,** (प्रोफेशनल ईस्पोर्ट प्लेअर)

मागील ५ वर्षापासून ऑनलाईन गेम प्रकारात आपले योगदान देतो आहे, कासिफ सय्यद यांच्या नाविन्यपूर्ण गेमच्या योगदान व आंतरराष्ट्रीय प्रवासाबद्धल आरळीसह तुळजापूर तालुक्यातील नातेवाईक व मित्रपरिवार यांच्याकडून कौतुक केले जात आहे.


**जाहीर प्रकटन**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/दंडणीय/कावि-६५८ दिनांक ३०/१०/२०२५**

समस्त गावकरी मौजे कडदोरा ता. उमरगा जिल्हा धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात श्री वगर माणिक सुरवसे रा. कडदोरा ता. उमरगा जि. धाराशिव यांनी स्वतःच्या नावे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

**जन्म झालेल्याचे नाव : वगर माणिक सुरवसे**

वरिल व्यक्तीचा मौजे कडदोरा ता.उमरगा जि. धाराशिव या ठिकाणी दि. ०१/०१/१९६७ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक २२/०८/२०२५ या रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म/मृत्यू बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार**

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# देश, राज्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेतही 'भाजप'च हवा : खा. अशोक चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. ३ नोव्हेंबर-**

देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीची सत्ता आहे. आता देगलूरच्या सर्वांगीण विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेतही भाजपाच हवा असे आवहन खा. अशोक चव्हाण यांनी केले. भारतीय जनता पार्टीच्या वतीने आज (दि. ०३ नोंव्हेबर) रोजी देगलूर येथील मोंढा मैदानावर भव्य जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात आले यावेळी ते बोलत होते.



या जनसंवाद सभेस राज्यसभेचे खासदार डॉ. अजित गोपछडे, जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे, माजी आ. अमरनाथ राजूरकर, आ. तुषार राठोड, आ. जितेश अंतापूरकर, माधवराव उच्चेकर, लक्ष्मण ठक्करवाड, जिल्हा चिटणीस अनिल पाटील खानापूरकर, माजी समाजकल्याण सभापती ड.रामराव नाईक आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना खा. अशोक चव्हाण म्हणाले की, शेतकऱ्यांची कर्जमाफी, बिदर रेल्वेमार्ग, लातुर रेल्वेमार्ग, पिण्याच्या पाण्याची योजना, सर्व घटकांच्या विकासासाठी मी कटिबध्द आहे. देगलूरच्या विकासाची गॅरंटी मी घेतो. देगलूरच्या जनतेवर माझा पूर्ण विश्वास आहे. येणाऱ्या काळात विकासाच्या पाठीशी देगलूरची जनता राहिल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. विरोधक नकारात्मक राजकारण करत आहेत. विकासाच्या मार्गात काही लोक स्पीड ब्रेकर होत आहेत, अशा स्पीड ब्रेकरला उखडून टाका. सध्या जिल्ह्यात काही लोकांचा शिव्या देऊन मत विकत घेण्याचा धंदा झाला आहे, असे म्हणत आ. प्रतापराव पाटील यांचा चांगलाच समाचार घेतला.

या जनसंवाद सभेत भारतीय जनता पार्टीत देगलूर - बिलोली मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला.

यावेळी बोलताना राज्यसभेचे खासदार डॉ. अजित गोपछडे म्हणाले की, देगलूर शहराला स्वच्छ, सुंदर आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध बनविण्याचे आमचे ध्येय आहे. शहरात सांस्कृतिक भवन, क्रीडांगण, एस. एम. जोशी सभागृह उभारले जाणार आहे. नांदेड-बिदर रेल्वे मार्गाचा विस्तार, तसेच सीमावर्ती गावांच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी आम्ही केंद्र आणि राज्यस्तरावर प्रयत्न करू, असेही त्यांनी सांगितले.

या सभेचे प्रास्ताविक पंचायत समितीचे माजी सभापती शिवाजीराव बळेगावकर यांनी केले. तर या सभेस आ. जितेश अंतापूरकर, माजी आ. अमरनाथ राजूरकर, आ. तुषार राठोड, भाजपा जिल्हाध्यक्ष संतुकराव हंबर्डे, महिला आघाडीचे जिल्हाध्यक्षा अनिता चोंडीकर यांनी मार्गदर्शन केले.

ही सभा देगलूर बिलोली विधानसभेचे आ. जितेश अंतापूरकर यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसंदर्भात ही जनसंवाद सभा महत्त्वपुर्ण ठरणार असून आगामी देगलूर नगरपरिषदेचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार इतर पक्षासारखे दादागिरी, जुगारबाज आम्ही देणार नाही. आमचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार हा प्रामाणिक, स्वच्छ प्रतिमेचा देऊ. येणाऱ्या काळात भाजपाचा झेंडा देगलूर नगरपरिषदेवर फडकवू असे जनसमुदायासमोर उपस्थितांनी सांगितले. यावेळी मंडळ अध्यक्ष शिवकुमार देवाडे व ड. प्रितम देशमुख यांच्यासह भारतीय जनता पार्टी शहर् व ग्रामीण कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले.

## जांब गटातून जयपाल गायकवाड यांना उत्स्फूर्त प्रतिसाद



**जांब** -जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसकडून जांब गटात जयपाल गायकवाड यांचे नाव जोरदार चर्चेत आले आहे. गायकवाड यांनी अलीकडेच हिप्परगा, दापका राजा आणि लादगा येथे घेतलेल्या संवाद दौऱ्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्थानिक युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांनी त्यांचे स्वागत करत काँग्रेसला पाठिंबा दर्शविला. जांब गट हा अनुसूचित जातीसाठी राखीव असून, या वेळी स्थानिक उमेदवाराचा मुद्दा ठळक झाला आहे. काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार हनमंतराव पाटील बेटमोगरेकर यांनी स्थानिक पातळीवरून उमेदवारीसाठी नावे मागवली होती, त्यात उच्चशिक्षित आणि पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत जयपाल गायकवाड यांचे नाव पुढे आले आहे. गायकवाड यांच्या संपर्क दौऱ्यांना वाढता प्रतिसाद मिळत असून, स्थानिक युवा चेहरा आणि प्रामाणिक प्रतिमा या बळावर काँग्रेसला जांब गटात गती मिळाल्याचे दिसून येत आहे. दुसरीकडे, भाजप व इतर पक्षांचे उमेदवार अद्याप निश्चित झालेले नाहीत. त्यामुळे गायकवाड यांच्या प्रचाराला जांब गटात सुरुवातीपासूनच वेग आला आहे.

## इच्छुक उमेदवार अंकुश भालेराव यांच्या गाव भेटीच्या दौऱ्याचा पहिला टप्पा पूर्ण!

**किनवट** -गोकुंदा पंचायत समिती गणातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेले अंकुश भालेराव यांनी आपल्या गाव भेटीच्या दौऱ्याचा पहिला टप्पा नुकताच पूर्ण केला आहे. गणातील विविध गावांना भेट देऊन त्यांनी नागरिकांशी संवाद साधला आणि त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. या गावांमध्ये झाला दौरा: पहिल्या टप्प्यात अंकुश भालेराव



यांनी गणातील महत्त्वाची गावे असलेल्या गोकुंदा, कोठारी, शनिवारपेठ, प्रधानसांगवी, बेंदी, बेदी तांडा, आणि आमडी या गावांना भेटी दिल्या. उद्देश आणि प्रतिसाद: या दौऱ्यात त्यांनी नागरिकांच्या समस्या, मूलभूत गरजा आणि स्थानिक प्रश्न जाणून घेतले. या भागातील नागरिकांनी श्री. अंकुश भालेराव यांचे उत्साहाने स्वागत केले आणि त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा केली. पुढील टप्प्याची तयारी: पहिल्या टप्प्याला मिळालेल्या चांगल्या प्रतिसादानंतर, आता अंकुश भालेराव लवकरच दौऱ्याचा पुढील टप्पा सुरू करणार असल्याचे त्यांच्या कडून आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगण्यात आले. उर्वरित गावांमध्ये भेट देऊन ते आपला जनसंपर्क वाढवणार आहेत. अंकुश भालेराव यांच्या या सक्रिय जनसंपर्क अभियानामुळे गोकुंदा पंचायत समिती गणातील राजकीय वातावरण अधिक तापले आहे.

स.अजितसिंग मंचरियालवाले,शिवकुमार देवकते, सुरेश चंदावाड, शादुल होणवडजकर, कैलास मादसवाड, प्रा.डॉ. गणेश जोशी, डॉ. अभय दांडगे, रमेश पांडे, रमेश चित्ते, प्रशांत गवळे,विजय मंगरुळे, श्रीधरराव कदम, योगगुरू सिताराम सोनटक्के, किशोर पसलवाड, मंगेश खंडागळे, आर.आर.यवतीकर, अबास काझी, विकास गजभारे,जीवन वडजे पाटील यांच्यासह नवीन नांदेड, नांदेड व उमरदरी येथील त्यांच्या संस्थेतील प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, आदी शेकडो हितचिंतकांनी शिवाजीराव जाधव यांना शुभेच्छा दिल्या.

## सुनील पाटील शिंदे यांची सावरगाव (न). गटातुन निवडणूक लढविण्याची तयारी

**लोहा** - तालुक्यातील सावरगाव (न.) जि.प. गटाचे इच्छुक उमेदवार सुनील शिंदे पाटील यांनी आगामी जि.प. निवडणूक लढविण्याची जय्यत तयारी केली आहे. सावरगाव (न.) गटातील पेनूर, आडगाव, खांबेगाव, हळदव या गावातील मतदारांच्या भेटी गाठी घेत असुन मतदारांचा सकात्मक प्रतिसाद दिसुन येत आहे. लोहा तालुक्यातील पेनुरचे भूमीपुत्र तथा पुणे येथील प्रसिद्ध स्वराज होम्सचे संचालक व सामाजिक चळवळीत युवा नेतृत्व सर्वसामान्य नागरिकाला मृदुभाषी आपलेश करणारे म्हणुन ओळख निर्माण केली आहे, शेतकरी मजुरदार यांना सहकार्याची भावना ठेवणारे म्हणुन मतदारांचा कल दिसून येत आहे. सामाजिक व धार्मिक कार्यात नेहमी सहकार्याची भावना ठेवणारे भावी उमेदवार समजले जातात. सावरगाव गटातील पेगुर, आडगाव खांबेगाव, हळदव वाडी,तांडे यासह अनेक गावांत झंझावात दौरा करत आहेत. .राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे लोहा कंधार मतदार संघाचे आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या संपर्कात कार्यालयात मुलाखत देऊन उमेदवारी मागणी केली आहे. आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी आगामी निवडणुकीमध्ये उमेदवारी निश्चित मानली जाते येणाऱ्याकात पक्षासाठी तन धन मनाने पक्षवाडी काम करुन सर्वसामान्य कुटुंब माझे कुटुंब म्हणुन अनेक संकटात आपली जिवाची बाजी लावून उभा राहिल असे म्हणाले यापुर्वी राजकारण या विषयाचा छंद नसताना अनेक गावांत सामाजिक कार्य म्हणुन महापुरुषाच्या पुतळ्यासाटी मदत केली आहे याचं जोरावर जनतेने ठरवले आहे या युवकाची समाजाला गरज आहे यामुळेच आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली सावरगाव (न) झिप गटात नशिब आजमावीत आहे.

## पर्यावरणपूरक वाढदिवस; लालवंडी शाळेत १०० फळझाडांची लागवड

**तभा वृत्तसेवा**
**नरसी, दि. ३ नोव्हेंबर-**



वाढदिवस म्हणजे फक्त केकमेणबत्ती नव्हे, तर समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची संधीही असते, याचा उत्तम आदर्श लालवंडीतील धनश्री नागेश येरसनवार हिने दाखवून दिला आहे. आपल्या वाढदिवसानिमित्त तिने लालवंडी जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात तब्बल १०० फळझाडे व शोभेची झाडे लावून पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संदेश दिला.

या हरित उपक्रमात कॅनिप्रास, मोरपंखी, तार, पारिजातक, फायकॅराट, तोडा, तोफखाना, जाहोपा, दुराई, महागणी यांसारख्या विविध फळझाडे व शोभेच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. ग्रामसेवक नागेश येरसनवार यांनी आपल्या मुलीच्या वाढदिवसाचे औचित्य साधून व्यर्थ खर्च न करता झाडे लावा, पर्यावरण वाचवा हा संदेश देत एक आदर्श घालून दिला. त्यांच्या या विचारपूर्वक उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या कार्यक्रमास भगवान पा. लंगडापुरे, प्रकाश जोंधळे, शिवराम अप्पा येरसनवार, रंजित पाटील कुरे, पत्रकार नागेश कल्याण, रामराव बामनपल्ले, व्यंकटराव इंद्रे, युवराज लालवंडे, नागेश संगेपवाड, शिवराज वरवटे, प्रताप बोमनाळे, माधव परगेवार, ॲड. नीलकंठ पा. कुरे तसेच मुख्याध्यापक देविदास बैस, शिक्षक शहाजी सुनपे आदींसह अनेक मान्यवर, ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या निमित्ताने उपस्थित सर्वांनी वृक्षारोपणाच्या माध्यमातून गाव सुशोभित करण्याचा संकल्प केला. 'हरित ग्राम सुंदर ग्राम' या संकल्पनेला या उपक्रमातून नवे बळ मिळाले असून, धनश्री येरसनवार हिचा वाढदिवस ग्रामस्थांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

## हदगांव पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांच्या अप-डाऊनमुळे नागरिकांची गैरसोय

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. ३ नोव्हेंबर-**

शासन प्रत्येक योजनेसाठी गावापासून ते दिल्ली पर्यंत कर्मचारी अधिकारी नेमुन लाखो रुपये खर्च करीत आहे. प्रत्येक कामासाठी अधिकारी नियुक्त करुन त्याला मुख्यालयी राहणे बंधनकारक आहे. पण हदगाव पंचायत समितीचे अनेक अधिकारी कर्मचारी मुख्यालयी न राहता आपल्या सोयीनुसार राहत असल्याने सर्व सामान्य माणसाला आपले काम करण्यासाठी अडचणीचा सामना करावा लागत असुन अधिकारी कर्मचारी मात्र आम्हाला नाही कोणाची भिती असे भासवीत असल्याने कर्तव्य दक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

प्रत्येक गावातील विकासाचा कणा म्हणून ग्रामसेवक प्रशासनाचा अधिकारी असतो. त्याला मुख्यालयी राहणे गरजेचे असते. पण एका ग्रामसेवकांना अनेक गावाचा कारभार असल्याने मला काय तुमचेच गाव आहे का दुसरेही गाव असल्याने मी तिथं आहे, मिटिंग



ला आहे. असे सांगुन वेळ काढत आहेत. गावातील दोन तीन गटांच्या राजकीय ग्रहणात विकास कामाचा दर्जा खालावला गेल्यामुळे ग्रामीण भागात अनेक अडचणी निर्माण झाल्या विकास फक्त कागदावरच दिसत असून परीणामी सर्व सामान्य माणसाला डोकेदुखी ठरत असुन आंधळ दळत कुत्र पिठ खातं अनेक गावांत ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, कोण आहे. कधी येतो हे तुरळक पुढारी यांनाच माहीत असल्याने सर्व सामान्य माणसाला काम पडले की वशीला लावल्या शिवाय काम होत नाही ही वस्तुस्थिती आहे.कार्यालयात गटविकास अधिकारी, पाणीपुरवठा कर्मचारी, बांधकाम व आस्थापना कर्मचारी, कृषी विभाग, पाणीपुरवठा विभाग, पशुसंवर्धन विभाग, एकात्मिक बाल विकास विभाग, रोहयोसारख्या, महत्त्वाच्या विभागाचे कर्मचारी नेहमी गैरहजर असतात. सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. उमेदवार कागदपत्रे जुळवाजुळव करण्यासाठी फिरत असल्याने ग्रामपंचायतीच्या फायदेशीर आहे पण ग्रामसेवक आपल्या सोयीनुसार राहत असल्याने उमेदवार मात्र फिरत असताना दिसत आहे. तर अधिकारी कर्मचारी आम्हाला नाही कोणाची भिती असे भासवीत असल्याने हदगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील गावांना कर्तव्य दक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी भेट दिली तर सत्य परिस्थिती समजणार आहे. कोणत्या गावात पंचायत समितीच्या अधिकारी कर्मचारी भेटी दिल्या हे सर्व सामान्याला विचारले तर सत्य समोर येणार आहे. आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या सिईओ यांनी अचानक भेट देतील असे सर्व सामान्य नागरिकांना आशा वाटत आहे.

## रत्नागिरीत उजळला ज्ञानाचा दीप; बाबाराव महादवाड यांचा राष्ट्रीय सन्मान सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. ३ नोव्हेंबर-**

नायगांव तालुक्यातील खंडगांव येथील भुमी पुत्र तथा कै. रामचंद्र पा.माध्यमिक विद्यालय शेळगांव गौरीचे मुख्याध्यापक बाबाराव रामजी महादवाड यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

शिक्षण हेच खरे परिवर्तनाचे शस्त्र मानणाऱ्या आणि आयुष्यभर विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी झटणाऱ्या शिक्षकांच्या कार्याला मानाचा मुजरा करत महात्मा ज्योतीराव फुले शिक्षक परिषद, महाराष्ट्र तर्फे महात्मा ज्योतीराव फुले राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५ हा सन्मान प्रदान करण्यात आला.

या वर्षीचा मानाचा पुरस्कार बाबाराव महादवाड, सेवानिवृत्त मुख्याध्यापक, कै. रामचंद्र पाटील माध्यमिक विद्यालय, शेळगाव गौरी, ता. नायगाव, जि. नांदेड यांना बहाल करण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे आयोजन स्व. वि. वा. सावरकर नाट्यगृह, रत्नागिरी येथे करण्यात आले होते. या प्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष



प्रा. डॉ. सखाराम वाघमारे, प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील, प्राचार्य गोपिनाथ व प्रदेश संयोजक सागर व्यंकटराव जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला. महात्मा फुलेंच्या विचारधारेवर आधारित ही परिषद गेल्या अनेक वर्षांपासून शैक्षणिक व सामाजिक कार्यात नवे आयाम निर्माण करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करत आहे..बाबाराव महादवाड यांनी प्राथमि क शिक्षक सेवेपासुन ते मुख्याध्यापक या पदाच्या सेवा काळात नायगांव तालुक्यातील शेळगाव गौरी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची जागृती निर्माण केली, समाजातील दुर्बल घटकांपर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे कार्य केले. त्यांच्या कार्यात फुले-शाहू-आंबेडकर विचारांचा ठसा स्पष्टपणे दिसून येतो. सन्मानपत्र स्वीकारताना भावूक होत बाबाराव महादवाड म्हणाले, हा पुरस्कार माझ्या आयुष्यभराच्या सेवेला लाभलेले खरे यश आहे. मी हा सन्मान माझ्या विद्यार्थ्यांना आणि सहकाऱ्यांना अर्पण करतो.

कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, अशा शिक्षकांमुळेच समाज उजळतो, शिक्षणाला आत्मा मिळतो आणि पिढ्या घडतात. महात्मा ज्योतीराव फुले यांच्या क्रांतिकारी कार्याची प्रेरणा घेऊन शिक्षण, समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी अखंड कार्य करणाऱ्या शिक्षकांना सलाम करत हा सोहळा उत्साहात पार पडला.शिक्षक हा केवळ ज्ञानदाता नसून समाजाच्या प्रगतीचा दीपस्तंभ असतो बाबाराव महादवाड यांच्या कार्याने हे पुन्हा अधोरेखित झाले. महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषद महाराष्ट्र या अंतर्गत कै.रामचंद्र पाटील माध्यमिक शाळेचे गौरी शेळगांव चे सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाबाराव रामजी महादवाड यांना नुकताच राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल नायगांव तालुक्यातील राजकीय ,सामाजिक ,शैक्षणिक,क्षेत्रातील अनेक मान्यवर मित्र मंडळी कडून अभिनंदन केले जात आहे.

## 'वादळ' आत्मकथनाचा प्रकाशन सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ३ नोव्हेंबर-**

येथील पीपल्स महाविद्यालय परिसरातील एज्युकेशन सोसायटी सभागृहात अर्जुन वाघमारे लिखित विस्तवाकडून वास्तवाकडील एक अविस्मरणीय प्रवास मांडणाऱ्या 'वादळ' या आत्मकथनाचे प्रकाशन नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, माजी खासदार तथा प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ.व्यंकटेश काब्दे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक तथा संविधानाचे गाढे अभ्यासक डॉ.अनंत राऊत हे होते. तर प्रमुख पाहुणे प्रसिद्ध साहित्यिक विचारवंत देविदास फुलारी, स्वा. रा.ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील माध्यम संकुलाचे संचालक डॉ.राजेंद्र गोणारकर, ज्येष्ठ नाट्यकर्मी डॉ.विजयकुमार माहुरे, लेखक तथा संपादक डॉ. विलास ढवळे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची प्रास्ताविक प्रा.अशोककुमार दवणे तर सूत्रसंचालन डॉ.प्रमोद वाघमारे यांनी केले तसेच आभार प्रदर्शन सुनिता वाघमारे (कदम) यांनी मांडले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी भीम पँथरचे मराठवाडा अध्यक्ष विनोद वाघमारे, प्रवीण गोडबोले नितीन वाघमारे, बालाजी बामिलवाड आदींनी परिश्रम घेतले.

# किनवटमध्ये उद्या भाजपाची जनसंवाद सभा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. ३ नोव्हेंबर-**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत किनवट शहरातील कलावती मंगल कार्यालय ५ नोव्हबंर ला सायंकाळी ५ वाजता भव्य जनसंवाद सभा आयोजित करण्यात आली आहे.

नगरपरिषद निवडणुकी साठी कुठल्याली क्षणी आचार संहीता लागण्याची



शक्यता असल्याने सर्वच राजकीपक्षानी जन संवाद सभा सभांचे आयोजन करुन इच्छूका सह स्थानिक पदाधीकाऱ्या समवेत बैठाका घेतल्याजात आहे . भाजपा साठी ही प्रतीष्ठेची निवडणूक असल्याने यश मीळवीण्या साठी रननीती आ.भिमराव केराम पुढे सरसावले आहेत या पार्श्वभूमीवर माजी मुख्यमंत्री खा.आशोकराव चव्हाण या जनसंवाद सभेला उपस्थीत राहून कार्यकर्त्याना मार्गदर्शन करणार आहे. या सभेला किनवट तालुक्यातील कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन आमदार भीमराव केराम यांनी केले,

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे नुकतेच भाजपाचे मराठवाडा संघटन मंत्री यांचाही दौरा झाला, या पार्श्वभूमीवर आगामी होऊ घालणाऱ्या नगरपालिका पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपचा झेंडा फडकवण्यासाठी खा.अशोकराव चव्हाण आणि आमदार भीमराव केराम यांच्या नेतृत्वाखाली जनसंवाद सभा आयोजित करण्यात आली आहे.

# मुदखेड शहरात आ. श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते विकास कामाचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. ३ नोव्हेंबर-**

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोक चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व भोकर विधानसभेच्या आमदार श्रीजया चव्हाण यांच्या उपस्थितीत दि.२ नोव्हेंबर रोजी मुदखेड शहरातील विविध प्रभागात कार्यालय नगरपरिषद विशेष रस्ता अनुदान अंतर्गत विकास कामाचे आ. श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

तसेच भोकर विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता



पक्षाच्या बूथ प्रमुख व शक्ती प्रमुख केंद्राची बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी भाजपाचे मराठवाडा विभागीय संघटक मंत्री संजय कौडगे, मुदखेड अर्धापूर भोकर या तिन्ही तालुक्यातील पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते,

यावेळी शहरातील प्रभाक क्र.१ मधील ओम शांती केंद्रापर्यंत व महादेव मंदिर परिसर सीसी रस्ता नाली बांधकाम, प्र. क्र. २ भिमनगर मधील समाज मंदिराच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम स्मशानभूमी कडे जाणारा रस्ता व नालीचे बांधकाम, प्र. क्र.४ सीसी रस्ते व नालीचे बांधकाम,प्र. क्र. ६ सीसी रस्ते व नालीचे बांधकाम,व विठ्ठल आचार्य यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन,मोंढा अंतर्गत विविध ठिकाणी रस्ता व नालीचे बांधकाम,व्यंकटेश नगर येथील रस्ता व नालीचे बांधकाम, कृष्णा नगर येथे रस्ता व नालीचे बांधकाम, ऊमरी चौक येथे ओपन प्लेस संरक्षण भिंत,वडार गल्ली येथील अंतर्गत रस्ते व नालीचे बांधकाम, वसंत नगर तांडा अंतर्गत सीसी रस्ते व नालीचे बांधकाम, शहरातील इत्यादी ठिकाणी विकास कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी प्रा. कैलास दाड, भाजपा शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण, माधव पाटील कदम, संजय आऊलवार, राजू बारतोंडे,गंगाधर डांगे, बजरंग खोडके, विनोद चंद्रे, शंकर राठी,उत्तम चव्हाण, प्रवीण काचावार, कुणाल चौदंते, बाळू पांचाळ, राम आबादार,शैलेश गुडमलवार,चांदू बोकेफोड, मुन्ना चौधरी, डॉ.संदीप पचलिंग, श्रीहरी बैनवाड, ऋषी पारवेकर, कपील लोखंडे, एकबाल कुरेशी, जय चंद्रे, नितिन चौदंते,अविनाश चौदंते,जयप्रकाश चौदंते, मधुकर दवणे, माजी नगरसेवीका सौ. वैशाली चौदंते, माजी नगरसेविका कमलबाई कांबळे, सौ.जयश्री देशमुख, यांच्यासह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.